# नवी मुंबईमध्ये कंत्राटदारावर गोळीबार

**पाच गोळ्या झाडून हल्लेखोर पसार**

**नवी मुंबई : बातमीदार**

सानपाडा डी मार्टजवळ शुक्रवार (दि. ३) रोजी सकाळी ९.५३ च्या सुमारास दोन अज्ञात हल्लेखोरांनी एका व्यक्तीवर गोळीबार केल्याची घटना घडली. पाच गोळ्या दुचाकीवरून आलेल्या अज्ञात हल्लेखोरांनी झाडल्याचे आढळून आले. गोळ्या लागल्याने राजाराम ठोके हे कंत्राटदार गंभीर जखमी झाले. नागरिकांनी ठोके यांना तातडीने रूग्णालयात दाखल केले. या घटनेत परिमंडळ एक व गुन्हे शाखा पोलीस संयुक्त तपास करीत आहेत.





शुक्रवारी सकाळच्या सुमारास जुईनगर रेल्वे स्टेशनजवळ, सानपाडा हद्दीतील, डी मार्ट समोर राजाराम ठोके हे कार थांबवून चहा घेत होते. त्या दरम्यान, दोन हल्लेखोर बाईकवरून आले. त्यांनी ठोके चहा पित बसलेल्या कारवर अंदाधुंद गोळीबार केला. जवळपास पाच गोळ्यांचा आवाज आल्याचे सीसीटिव्हीतून आढळून आले आहे. या घटनेत राजाराम ठोके यांच्या पोटात तीन, हाताच्या कोपऱ्याला एक, व एक गोळी हाताला घासून गेली. गाडीतून ते खाली कोसळले. त्यांना जवळच्या रूग्णालयात दाखल केले. त्यानंतर वाशी येथील पालिकेच्या रूग्णालयात हलविण्यात आले.

सदर घटनेची माहिती मिळण्यास सानपाडा पोलीस व गुन्हे शाखेने घटनास्थळी धाव घेतली.घटना घडलेला परिसर हा रेल्वे स्थानकाच्या जवळ असल्याने वर्दळीचा मानला जातो. अशातच सकाळच्या वेळेस झालेल्या या फायरिंगमुळे परिसरात दहशत निर्माण झाली आहे. फायरिंग करणारे दोन्ही आरोपींचा सीसीटीव्हीच्या आधारावर पोलीस शोध घेत आहेत.

## पोलिसांची तीन पथके करताहेत तपास

***राजाराम ठोके यांना एपीएमसीतील भाजी बाजारातील कचरा ओला उचलण्याचे कंत्राट मिळाले होते तसेच ते माहिती अधिकार कार्यकर्ते म्हणून ओळखले जातात. त्यामुळे त्यांच्यावरील हल्ल्याशी हा धागादेखील जोडून पहिला जात असून पोलिसांनी तपासाची सूत्रे त्या बाजूने देखील वळवली आहेत. जागेचा पंचनामा, फरार आरोपींचे वर्णन यावरून संशयित यांचा शोध पोलिसांनी सुरू केला असून यासाठी पोलिसांची तीन पथके समांतर तपास करत आहेत.***




**पेण : शिवोहं प्रतिष्ठानच्या विद्यमाने युवा नेते भूषण कडू यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून १८ वर्षावरील पुरुष व महिलांकरीता मोफत कर्करोग तपासणी व जनजागृती शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी रा.जि.प. माजी अध्यक्षा अ‍ॅड. निलिमा पाटील यांचे हस्ते दिनदर्शिकेचे प्रकाशने करण्यात आले. या वेळी भूषण कडू यांचे आईवडील, नगरसेवक प्रकाश पाटील, नगरसेवक संतोष पाटील, संजय म्हात्रे, पत्रकार विजय मोकल, अनिस मनियार, डॉ. भारती प्रितम भोईर, डॉ. सोनाली तेलग, भूषण कडू यांची पत्नी अश्विनी कडू आदी उपस्थित होते**

# क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी

**महापारेषणकडून विनम्र अभिवादन**

**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीत (महापारेषण) क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची १९४ वी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. याप्रसंगी सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या वतीने सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला अभिवादन करण्यात आले.

क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस महापारेषणचे संचालक (मानव संसाधन) सुगत गमरे यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी मुख्य अभियंता महेंद्र वाळके, सुनील सूर्यवंशी, भूषण बल्लाळ, किशोर गरूड, जुईली वाघ, मुख्य महाव्यवस्थापक (वित्त व लेखा) श्रीमती अंजू गुप्ता, मुख्य महाव्यवस्थापक (मानव संसाधन) मंगेश शिंदे, मुख्य महाव्यवस्थापक (माहिती तंत्रज्ञान) नागसेन वानखेडे, महाव्यवस्थापक (मानव संसाधन) राजू गायकवाड,



मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी भरत पाटील, उपमहाव्यवस्थापक (मानव संसाधन) नितीन कांबळे, उपमहाव्यवस्थापक (मानव संसाधन) अभय रोही, अधीक्षक अभियंता अमित नाईक, ी ज्योती चिमटे, शिष्टाचार अधिकारी सतिश जाधव यांचेसह विविध अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी संचालक सुगत गमरे, मुख्य विधी सल्लागार डॉ. कीर्ती कुळकर्णी, कार्यकारी अभियंता श्रीकांत पेटकर यांनी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जीवनकार्याविषयीची माहिती सांगितली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार भारती कांबळे यांनी मानले.

## गोल्डन ग्रुप पनवेलच्या अध्यक्षपदी वसंत भगत

**पनवेल : वार्ताहर**

गोल्डन ग्रुप पनवेलच्या अध्यक्षपदी वसंत भगत यांची बिनविरोध निवड करण्यात आली. गोल्डन ग्रुप पनवेलच्या वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये सरचिटणीसपदी नीलकंठ भगत उपाध्यक्षपदी अनिल नलावडे आणि खजिनदारपदी रत्नाकर पाटील यांची ही बिनविरोध निवड करण्यात आली.



वीस वर्षे सातत्याने गोल्डन ग्रुप समाजकारणात अग्रेसर राहिलेला आहे. तालुक्यातील अनेक आदिवासी शाळांची दुरुस्ती, त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांना दप्तरे, वह्या पुस्तकांचे तसेच गणवेश वाटप करण्यात येतात महापुरुषांच्या जयंती व पुण्यतिथी साजरी करणे, आरोग्य शिबिर भरवणे असे कार्यक्रम राबवीत असतो.नैसर्गिक आपत्तींना सामोरे जात असताना ग्रुपने नेहमीच आपला मदतीचा हात आपत्तीग्रस्तांसाठी पुढे केला आहे. अनेक वेळा नैसर्गिक आपत्तीग्रस्तांना आर्थिक मदत करण्यात आली आहे. यापुढे देखील गोल्डन ग्रुप समाजकारणात अशाच प्रकारे सहभाग घेत राहील अशी ग्वाही नवनिर्वाचित अध्यक्ष वसंत भगत यांनी दिली. याप्रसंगी मावळचे अध्यक्ष अमोल गवारी, विवेक पाटील, प्रकाश फडके, विजय पाटील, आशुतोष पाटील, पप्पू गायकवाड आदी सदस्य उपस्थित होते.

## बॅटरी चोरणारे दोन तरुण ताब्यात

**पनवेल : वार्ताहर**

ट्रान्सपोर्टमध्ये वापरत असलेल्या बल्करमधून अज्ञात चोरट्यांनी दोन बॅटऱ्यांची चोरी केल्याची घटना पनवेलजवळील टी पॉईंटजवळ घडली होती. या प्रकरणी पनवेल शहर पोलिसांनी दोन तरुणांना ताब्यात घेतले असून यातील एक तरुण हा अल्पवयीन मुलगा आहे.

यावरील चालक सरोज याने बल्कर उभा करून ठेवला असता अज्ञात चोरट्यांनी या ठिकाणावरुन ३० हजार रुपये किमतीच्या दोन निळ्या पांढऱ्या रंगाच्या बॅटऱ्यांची चोरी केली होती. याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आल्यानंतर वपोनि नितीन ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक विनोद लभडे, हवालदार नितीन वाघमारे, अविनाश गंथडे, अमोल डोईफोडे, परेश म्हात्रे, महेंद्र वायकर, नाईक विनोद देशमुख, शिपाई विशाल दुधे, चंद्रशेखर चौधरी आदींच्या पथकाने परिसरात शोध घेतला असता गुप्त बातमीदाराकडून आरोपी ओमकार नायक (वय २०, रा. अजिवली) व त्यांचा अल्पवयीन साथीदार यांची माहिती मिळाली. त्यानुसार या दोघांना पनवेल परिसरातून ताब्यात घेतले असता त्यांनी गुन्ह्याची कबुली दिली, चोरीच्या बॅटऱ्या पोलिसांनी हस्तगत केल्या आहेत.

## दारुच्या नशेत तरुण बेपत्ता

**पनवेल : वार्ताहर**

दारुच्या नशेत राहत्या घरातून कोणास काही एक न सांगता एक तरुण कुठेतरी निघून गेला. तो हरविल्याची तक्रार उलवे पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.



प्रशांत प्रभाकर मोरे (वय २७, रा. सेक्टर १९ उलवे) असे या तरुणाचे नाव असून उंची पाच फुट पाच इंच, बांधा मध्यम, रंग गोरा, चेहरा गोल, केस काळे, नाक सरळ, डोळे काळे असून अंगात काळ्या रंगाचा टी-शर्ट व राखाडी रंगाची जिन्स पॅन्ट तसेच पायामध्ये स्लिपर घातलेली आहे. त्याला मराठी व हिंदी भाषा अवगत आहे. या तरुणाबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास उलवे पोलीस ठाणे किंवा हवादार कल्पेश पाटील यांच्याशी संपर्क साधावा.

## रामशेठ ठाकूर महाविद्यालयाची बॉम्बे स्टॉक एक्सचेंज व आरबीआयच्या मुद्रा संग्रहालयाला भेट

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व शास्त्र महाविद्यालयातील बीएमएस, अकाउंट व फायनान्स व वाणिज्य शाखेतील विद्यार्थी व विद्यार्थिनी यांनी शुक्रवारी (दि. ३) फोर्ट येथील बॉम्बे स्टॉक एक्सचेंज व आरबीआयच्या मुद्रा संग्रहालयाला भेट दिली.



या वेळी बॉम्बे स्टॉक एक्सचेंजच्या पदाधिकाऱ्यांनी विद्यार्थ्यांना स्टॉक मार्केटविषयी मार्गदर्शन केले. या भेटीमध्ये विद्यार्थ्यांनी आरबीआय म्युझियममध्ये सुमारे १५० चलने, त्यामध्ये प्रामुख्याने सहाव्या शतकापासून ते आज २१व्या शतकापर्यंत इंडस व्हॅली, खुशाना एम्पायर, गुप्तकालीन, ब्रिटिश कालीन, प्राचीन चलन तसेच वेगवेगळी वित्तीय साधने पाहून त्याचा अनुभव घेतला.

हा शैक्षणिक उपक्रम महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्य डॉ. महेश्वरी झिरपे त्यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आला तसेच त्यांनी भेटीसाठी विद्यार्थी व विद्यार्थिनींना प्रोत्साहन दिले व शुभेच्छा दिल्या. या भेटीचे आयोजन प्रा. प्रवर शर्मा समन्वयक वाणिज्य संघटना व प्रा. राहुल कांबळे यांनी केले तसेच प्रा. नंदिनी सपकाळ, प्रा. डॉ. महादेव चव्हाण, प्रा.विशाल देशमुख, प्रा. मनोज यादव, प्रा. प्रमोद वाघे, प्रा. योगिता पाटील, प्रा. आनंद शेलार, प्रा. तनुजा सुमन व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.

## विद्यार्थ्यांनी अनुभवली पोलिसांची शस्त्रे

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

तुर्भे पोलीस ठाणे येथे एरोस्पेस इंजीनियरिंग कॉलेज, तुर्भे येथील विद्यार्थी यांना पोलीस ठाणे येथे बोलावून पोलीस ठाणेचे कामकाज, पोलिसांकडील शस्त्रास्त्रे याबाबत माहिती देऊन पोलीस ठाणे मधील विविध विभाग यांची माहिती देण्यात आली. सदर कार्यक्रम आबासाहेब पाटील वरिष्ठ पोलीस निरीक्षक तुर्भे पोलीस ठाणे यांच्या सूचनेनुसार घेण्यात आला

विद्यार्थ्याना लहान मुलांसंदर्भात होणारे गुन्हे, सायबर सुरक्षा, महिला सुरक्षा, सोशल मीडिया वापरताना घ्यावयाची काळजी, वाहतुकीचे नियम, अंमली पदार्थ विरोधी कायदे याबाबत माहिती करून देण्यात आली तसेच पोलीस हेल्पलाइन नंबर, डायल ११२, सायबर सुरक्षा हेल्पलाइन नंबर १९३० , नवी मुंबई पोलीस व्हाट्सअप चैनल , नवी मुंबई पोलीस यू ट्यूब चॅनल बाबत माहिती देऊन फॉलो करण्याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत.

कार्यक्रमाचे वेळी पो.नि. (गुन्हे) सतीश चाबुकस्वार, पोलीस उपनिरीक्षक तुकाराम नागरे, पोलीस उपनिरीक्षक निलेश कोंडाळकर व गोपनीय अंमलदार यांनी उपस्थित विद्यार्थ्याना मार्गदर्शन केले. सदर वेळी एरोस्पेस इंजीनियरिंग कॉलेजचे ३८ विद्यार्थी, २ शिक्षक उपस्थित होते.

## प्रक्रिया सुविधा प्रकल्पासाठी जनेपचे औपचारिक अधिसूचना पत्र जारी

**उरण : प्रतिनिधी**

जवाहरलाल नेहरू पत्तन प्राधिकरणाने ३० डिसेंबर २०२४ रोजी जनेप प्राधिकरण येथे निर्यात-आयात सह देशांतर्गत कृषी वस्तू-आधारित प्रक्रिया आणि साठवण सुविधा विकसित करण्यासाठी मेसर्स ट्रायडेंट ॲग्रोकॉम एक्सपोर्ट्स प्रायव्हेट लिमिटेड आणि मेसर्स मॅन इन्फ्राकॉन्स्ट्रक्शन लिमिटेड (कंसोर्टियम) यांना लेटर ऑफ अवॉर्ड (एलओए) जारी केले आहे. हा प्रकल्प बंदर संकुलातील २७ एकर जमिनीवर उभारला जाणार असून या प्रकल्पाचे मूल्य अंदाजे २८४ कोटी रुपये आहे. हा प्रकल्प भारताच्या कृषी लॉजिस्टिक क्षमता वाढवेल आणि देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय कृषी व्यापाराच्या वाढीला आधार देईल.

या नवीन सुविधेच्या माध्यमातून, भारताच्या कृषी निर्यात पायाभूत सुविधा बळकट करण्यात जनेप प्राधिकरण महत्त्वपूर्ण भूमिका बजावत आहे. नवीन वर्षात, प्रगती आणि विकासाला गती देण्यावर तसेच प्रमुख प्रकल्प वेळेवर पूर्ण करण्यासाठी वेगवान काम सुनिश्चित करण्यावर लक्ष असल्याचे प्राधिकरणाचे अध्यक्ष उन्मेष वाघ यांनी म्हटले आहे.

एकदा कार्यान्वित झाल्यावर, या सुविधांतर्गत दरवर्षी सुमारे १.२ दशलक्ष टन माल हाताळण्याची अपेक्षा असून कृषी मालासाठी प्रक्रिया, साठवण आणि वाहतूक पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा करून देशाच्या कृषी व्यापारात लक्षणीय योगदान मिळणे अपेक्षित आहे.

जवाहरलाल नेहरू बंदराने पुरवलेली ही भारतातील अशा प्रकारची पहिलीच सुविधा आहे. अन्न सुरक्षा आणि व्यापार नियमांचे पालन सुनिश्चित करण्याच्या वचनबद्धतेवर भर देत, प्रक्रिया, वर्गीकरण, पॅकिंग आणि प्रयोगशाळा सुविधांसह सर्वसमावेशक सेवा प्रदान करण्यासाठी या सुविधेची रचना करण्यात आली आहे आणि केवळ महाराष्ट्रच नव्हे तर मध्य प्रदेश आणि गुजरातसारख्या इतर राज्यांच्या कृषी उत्पादनांच्या देखील गरजा पूर्ण करेल. या प्रकल्पाला १६ जुलै २०२४ रोजी केंद्रीय बंदरे, नौवहन आणि जलमार्ग मंत्री सर्बानंद सोनोवाल यांच्याकडून मंजुरी मिळाली आहे.

## खालापूर शहरात भाजप सदस्यता अभियानाला उत्स्फूर्त प्रतिसाद

**खालापूर : रामप्रहर वृत**

भाजपचे सदस्यता अभियान संघटन पर्व सध्या महाराष्ट्रासह संपूर्ण देशभरात सुरू आहे. या अनुषंगाने खालापूर पोलीस स्टेशन बाहेर खालापूर पूर्व मंडल अध्यक्ष सनी यादव यांच्या नेृत्ववाखाली खालापूर भाजप शहर व खालापूर तालुका पूर्व मंडळातील कार्यकर्ते यांनी उपस्थित राहून सदस्यता मोहिमेत सामील होऊन आपला सहभाग नोंदवला.

खालापूर हे तालुक्याचे ठिकाण असल्याने सर्वच शासकीय कार्यालये खालापूर मध्ये आहेत. तालुक्यातून अनेक नागरिक हे कामासाठी येत असतात त्यावेळी येणाऱ्या नागरिकांनी सुद्धा भाजपा सदस्यता मोहिमेत उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. यावेळी भाजपा शहर अध्यक्ष दिपक जगताप यांनी आपली जबाबदारी चोख बजावली.



या वेळी खालापूर पूर्व मंडल अध्यक्ष सनी यादव, भाजप जिल्हा उपाध्यक्ष विठ्ठल मोरे, खालापूर तालुका सरचिटणीस रवींद्र पाटील, कर्जत विधानसभा युवा मोर्चा निवडणुक प्रमुख प्रसाद पाटील, चौक येथील युवा नेते विनोद भोईर, खालापूर शहर सरचिटणीस योगेश जाधव, शहर उपाध्यक्ष अमीर पारठे, विलास पाटील, हनुमंत पारठे, विशाल लोते आदींसह पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

## ‘सीकेटी’च्या विद्यार्थ्यांनी पाहिला गुजरातमधील भव्य स्टॅच्यू ऑफ युनिटी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

शैक्षणिक पर्यटन विद्यार्थ्यांना त्यांच्या अभ्यासक्रमातील विषयांबद्दल अनुभव मिळण्याची तसेच विविध संस्कृती आणि दृष्टिकोन शिकण्याची संधी देते. तसेच विद्यार्थ्यांना संवाद, समस्येचे निराकरण आणि गंभीर विचार यासारख्या महत्त्वांच्या कौशल्यांचा सराव करण्याची संधी देते या सगळयाचा विचार करून सी.के. टी. इंग्रजी माध्यम विद्यालयाच्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक सहलीचे आयोजन दि. १७ ते २० डिसेंबर



२४ या कालावधीत करण्यात आले होते.

या सहली दरम्यान विद्यार्थ्यांना प्राणी संग्रहालय, जगप्रसिध्द आणि जगातील सर्वात उंच पोलादी पुरूष सरदार वल्लभभाई पटेल यांचा पुतळा, नर्मदा नदीच्या काठावरील लेझर शो, नर्मदा आरती, भगवान शिव तांडव लेडार शो, बटर फ्लाय गार्डन, स्वामी नारायण मंदिर इ. ठिकाणे दाखविण्यात आली. २० तारखेला सकाळी सर्व विद्यार्थी व शिक्षक ही शैक्षणिक सहल यशस्वीरित्या पूर्ण करून सुखरूप परत आले.

अशा प्रकारच्या शैक्षणिक सहली आयोजित केल्याने विद्यार्थ्यांना आपल्या परिक्षेत्रा बाहेर जाण्यास आणि नवीन गोष्टी अनुभवण्यास प्रोत्साहित करते. असे शाळेचे मुख्याध्यापक संतोष चव्हाण यांनी आपल्या भावना व्यक्त करताना सांगितले.

**दुखवटा**

## अरुणा देशमुख

**पनवेल** : तालुक्यातील गव्हाण येथील अरुणा कमळाकर देशमुख यांचे गुरुवारी (दि. २) दीर्घ आजाराने निधन झाले. त्या ६१ वर्षांच्या होत्या.



त्यांच्या पश्चात पती कमळाकर त्रिंबक देशमुख, दीर भाजपचे ज्येष्ठ नेते वाय.टी. देशमुख व जयवंत त्रिंबक देशमुख, मुलगा संकेत देशमुख, पुतण्या अमोल देशमुख, वैभव देशमुख, विराज देशमुख व मोठा परिवार आहे.

कै. अरुणा देशमुख यांच्या अंत्ययात्रेला भाजपचे तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत, वसंत म्हात्रे, रतन भगत आदी सामाजिक, शैक्षणिक, राजकीय क्षेत्रातील मान्यवर, नातेवाईक आणि पंचक्रोशीतील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. दशक्रिया व उत्तरकार्य विधी ११ जानेवारीला गव्हाण येथे होणार आहे.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. –मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com

# ‘सीकेटी’त पारितोषिक वितरण



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या नवीन पनवेल येथील चांगू काना ठाकूर (सीकेटी) विद्यालय, इंग्रजी माध्यमिक विभागाचा पारितोषिक वितरण सोहळा शुक्रवारी (दि. ३) उत्साहात झाला.

या सोहळयास प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे सदस्य अमोघ ठाकूर, माजी विद्यार्थिनी व पनवेल मनपा प्रथम श्रेणी अधिकारी मधुलिका शेटे-लाड, माजी नगरसेविका ॲड. वृषाली वाघमारे, शिक्षक पालक संघाचे उपाध्यक्ष सुधीर ठाकूर, सहसचिव श्रावणी वरेकर, इंग्रजी प्राथमिक मुख्याध्यापिका नीलिमा शिंदे, पूर्व प्राथमिक पर्यवेक्षिका वैषाली पारधी, माध्यमिक पर्यवेक्षिका निरजा अदुरी, मराठी प्राथमिक मुख्याध्यापक सुभाष मानकर, माध्यमिकचे मुख्याध्यापक श्री. कैलास सत्रे, उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य प्रशांत मोरे उपस्थित होते.

शैक्षणिक, कला, क्रीडा अशा अनेक क्षेत्रात नैपुण्य मिळवलेल्या विद्यार्थ्यांना या वेळी प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते गौरविण्यात आले.

प्रास्ताविकात मुख्याध्यापक संतोष चव्हाण यांनी पारितोषिकप्राप्त विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. वृषाली वाघमारे यांनी सातत्याने प्रयत्न करणाऱ्या विद्यार्थ्यांना कवितेच्या माध्यमातून मार्गदर्शन करताना खचून जाऊ नका, गुणी विद्यार्थ्यांनो सद्‌गुणी व्हा, असा मोलाचा संदेश दिला.

मधुलिका शेटे-लाड यांनी शाळेतील आपल्या आठवणींना उजाळा देत शिक्षणाबरोबरच खेळाचेही तितकेच महत्त्व आहे, असे सांगून शिक्षकांनी वेळोवेळी केलेल्या मार्गदर्शनाबद्दल आभार व्यक्त करत विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.





**पनवेल : प्रकल्पग्रस्तांचे झुंझार नेते दिवंगत दि.बा. पाटील यांच्याकडे असलेली भारतीय संविधानाची प्रत त्यांचे पुत्र व पनवेल-उरण आगरी समाज मंडळाचे अध्यक्ष अतुल पाटील यांनी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर व आमदार प्रशांत ठाकूर यांना प्रदान केली. या वेळी महापालिकेचे माजी सभागृहनेते परेश ठाकूर, माजी नगरसेविका दर्शना भोईर, मंडळाचे उपाध्यक्ष जे.डी. तांडेल, कोषाध्यक्ष विजय गायकर उपस्थित होते.**

# रामशेठ ठाकूर महाविद्यालयात सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी



**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात शुक्रवारी (दि. ३) स्टाफ वेल्फेअर समितीच्या वतीने क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती उत्साहात साजरी केली.

महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्य डॉ. महेश्वरी झिरपे यांनी सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून सावित्रीबाई फुले यांनी स्त्री शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवताना जनतेच्या प्रचंड रोषाला बळी पडून, प्रसंगी अंगावर शेण माती झेलून न डगमगता कार्य सुरूच ठेवले. यासाठी महात्मा फुले यांची खंबीर साथ त्यांना लाभली व यांच्या कार्याला अभिवादन करत त्यांच्यामुळेच आज महिला विविध क्षेत्रात आपली छाप उमटवून आपल्याला सिद्ध करत असल्याचे त्यांनी सांगितले. देशातील विविध क्षेत्रातील यशस्वी महिलांची त्यांनी उदाहरणेही दिली.

कार्यक्रमास महाविद्यालयाचे विद्यार्थी व विद्यार्थिनी, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे आयोजन प्रा. रिजवाना मोमीन यांनी केले तसेच स्टाफ हेल्पर समितीतील इतर सर्व प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी सहकार्य केले.

# फेक वेबसाईट कंपनी संचालकांना अटक

**पनवेल : वार्ताहर**

सायबर गुन्ह्याकरिता नामांकित कंपन्यांच्या , गेमिंगच्या, क्रिप्तो वॉलेटच्या फेक वेबसाईट व फेक ॲप बनवून देणाऱ्या तामिळनाडूस्थित कंपनीच्या संचालक आरोपीस पनवेल सायबर सेलने (पीसीसी) अटक केली आहे.

या संदर्भात हॉटेल्सना ऑनलाईन रेटिंग देण्याच्या टास्कमधून चांगली कमाई देण्याचे आमिष दाखवून फिर्यादी याची एकूण १९,४३,३८५ रुपयांची फसवणूक करण्यात आल्याने वर नमुदप्रमाने न्हावा शेवा पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल होता. या गुन्ह्याचा तांत्रिक तपास सायबर सेलच्या पोलीस निरीक्षक दिपाली पाटील व त्यांचे पथक करीत असताना तामिळनाडूस्थित एका कंपनीने गुन्ह्यात वापरलेली वेबसाईट बनविल्याचे निष्पन्न झाले. ही कंपनी ब्लॉकचैन डेव्हलपमेंट करणारी असून न्यायालयाकडून सर्च वॉरंट प्राप्त करून या कंपनीमध्ये सर्च घेतला असता त्या कंपनीने देशातील नामांकित कंपन्यांची क्लोन वेबसाईट बनविल्याचे तांत्रिक पुरावे मिळून आले. गुन्ह्यात निष्पन्न सहा आरोपींनी उच्च न्यायालय, मुंबई येथे अटकपूर्व जामिनावर केलेला अर्ज न्यायालयाने फेटाळला व आरोपी पसार झाले. सहापैकी दोन आरोपी सेंथुर पांडियन (वय ३०) आणि तिरुपती अलगरस्वामी (वय ३५) यांना तामिळनाडूमधून अटक करण्यात आली. या गुन्ह्याचा अधिक तपास पनवेल सायबर सेल करीत आहे.

# सिडको भवनात सावित्रीबाई फुले जयंती

**नवी मुंबई : बातमीदार**

सिडको बी.सी. एम्प्लॉईज असोसिएशनतर्फे आयोजित सावित्रीबाई फुले जयंती सोहळा सिडको भवन येथे शुक्रवारी (दि. ३) झाला. या कार्यक्रमाकरिता डॉ. कविता वरे या प्रमुख वक्त्या म्हणून उपस्थित होत्या. त्यांनी सावित्रीबाईंचा जीवनप्रवास आणि आजची स्त्री मुक्ती या विषयाबाबत उपस्थितांना मार्गदर्शन केले.



या वेळी सुरेश मेंगडे पोलीस उपाआयुक्त तथा मुख्य दक्षता अधिकारी सिडको हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. अनुपमा करणम अतिरिक्त मुख्य नियोजनकार सिडको या कार्यक्रमाच्या अध्यक्षा म्हणून उपस्थित होत्या. त्याचबरोबर सिडको युनियनचे अध्यक्ष संजय पाटील, नरेंद्र हिरे, नितीन कांबळे, सिडको बी. सी. एम्प्लॉईज असोसिएशन यांसह सिडकोतील विभाग प्रमुख, अधिकारी आणि कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते सावित्रीबाईंच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमास प्रारंभ करण्यात आला. वैचारिक रोपटे व आंबेडकरी आई हे पुस्तक देऊन मान्यवरांचा सत्कार करण्यात आला.

जयंतीच्या निमित्ताने सिडको महामंडळातील व महामंडळाबाहेरील कर्तृत्वान महिलांना सावित्रीच्या लेकी या विशेष पुरस्काराने सन्मानित करण्याचा स्तुत्य उपक्रम राबविण्यात येतो. या वर्षीच्या सावित्रीच्या लेकी या पुरस्काराने प्रिया के. अतिरिक्त मुख्य नियोजनकार सिडको आणि डॉ. बिंदु मुरलीधर वरिष्ठ परिवहन अभियंता (विमानतळ, रेल्वे व विशेष प्रकल्प) यांना सन्मानित करण्यात आले.

# खारघरमध्ये सोसायटीच्या स्वच्छतागृहात कोल्हा

**पनवेल : वार्ताहर**

खारघर सेक्टर १६मधील वास्तुविहार सोसायटी आवारातील स्वच्छतागृहात कोल्हा लपून बसल्याचे मुलांच्या निदर्शनास येताच मुलांनी पालकांना माहिती दिली. दरम्यान, या घटनेची वन विभागाला माहिती प्राप्त होताच तत्काळ घटनास्थळी धाव घेऊन वन विभाग कर्मचाऱ्यांनी या कोल्ह्याला पिंजरामध्ये जेरबंद करून पनवेल परिसरातील निसर्गाच्या सानिध्यात सोडले.

वास्तुविहार सोसायटीच्या आवारात मुले वर्षाचा शेवट आणि नवीन वर्षाचे आगमन होणार असल्यामुळे खेळात मग्न होती. या वेळी बाहेरुन कोल्ह्याने येऊन थेट वास्तुविहार सोसायटीच्या आवारात असलेल्या स्वच्छतागृहात प्रवेश केला.

याबाबत मुलांनी घर गाठून पालकांना माहिती दिली. त्यानंतर पालकांनी सोसायटीमधील रहिवासी आणि समीर कदम यांनी माहिती दिली. या माहितीची दखल घेऊन कदम यांनी तत्काळ वन विभाग अधिकाऱ्यांशी संपर्क साधून माहिती दिली. त्यानंतर वन विभाग कर्मचारी जगदीश राक्षे, प्रवीण जैस्वाल, सागर माळी आणि सर्पमित्र रघुनाथ जाधव आदींनी रात्री नऊच्या सुमारास वास्तुविहार सोसायटी आवारातील स्वच्छतागृहात लपलेल्या कोल्ह्याला पिंजऱ्यात जेरबंद केल्याने नागरिकांनी सुटकेचा निश्वास सोडला.

# पनवेलमध्ये उद्या रक्तदान शिबिर

**पनवेल : वार्ताहर**

श्री प्रल्हादराय झुलेलाल ट्रस्ट, पूज्य सिंधी पंचायत ट्रस्ट, विद्यार्थी वाहक संस्था, आम्ही रक्तदाते पनवेलचे आणि सहयोगी संस्थातर्फे रक्तदान शिबिर पनवेल शहरातील सिंधी पंचायत हॉल येथे ५ जानेवारी रोजी सकाळी ९ ते दुपारी ३ वाजेपर्यंत आयोजित करण्यात आले आहे.

नाव नोंदणी तसेच अधिक माहितीसाठी राजू सचदेव (९८२०९३७३७९), भूषण चोणकर (९३२४१२५९२४) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.



**पनवेल : भाजप तालुका युवा मोर्चा अंतर्गत दापोली गाव अध्यक्षपदी प्रफुल्ल जितेकर यांची नियुक्ती करण्यात आली आहे. या संदर्भातील नियुक्तीपत्र आमदार प्रशांत ठाकूर यांनी शुक्रवारी प्रदान केले तसेच त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. या वेळी तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत, सरचिटणीस राजेंद्र पाटील, भूपेंद्र पाटील, माजी पं.स. सदस्य निलेश पाटील, ओबीसी मोर्चा जिल्हा सरचिटणीस दशरथ म्हात्रे यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.**

**पनवेल : अधिराज सामाजिक विकास मंडळ आणि पंचायत समितीचे माजी सदस्य निलेश पाटील यांच्या माध्यमातून सन २०२५ची दिनदर्शिका प्रसिद्ध करण्यात आली आहे. या दिनदर्शिकेचे प्रकाशन आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते शुक्रवारी झाले. त्यांनी हे वर्ष सर्वांना सुख-समृद्धीचे आणि भरभराटीचे जावो अशा शुभेच्छा दिल्या. या वेळी भाजपचे तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत, माजी पं. स. सदस्य निलेश पाटील, भाजप तालुका सरचिटणीस राजेंद्र पाटील, भूपेंद्र पाटील, माजी नगरसेवक प्रभाकर बहिरा, सचिन खैरे, आकाश भाटी आदी उपस्थित होते.**



# सीकेटी उच्च माध्यमिक विद्यालयात वार्षिक पारितोषिक वितरण

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या नवीन पनवेल येथील चांगू काना ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयात प्रथम वार्षिक पारितोषिक वितरण कार्यक्रम झाला. माजी नगरसेविका ॲड. वृषाली वाघमारे या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या.

या कार्यक्रमांतर्गत शैक्षणिक समिती, सांस्कृतिक समिती, सहशालेय समिती, क्रीडा समिती, एनएसएस समिती, अभ्यासेतर समिती, विषय उपक्रम, विज्ञान समिती, ऑलिम्पियाड समिती अशा विविध समित्यांनी आयोजित केलेल्या विविध उपक्रमात सहभागी झालेल्या व पारितोषिक मिळविलेल्या कला वाणिज्य व विज्ञान विभागातील २५८ विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

कार्यक्रमास मराठी माध्यमिक विभागाचे मुख्याध्यापक कैलास सत्रे, उच्च माध्यमिक विभागाचे प्राचार्य प्रशांत मोरे, इंग्रजी माध्यमिक विभागाचे मुख्याध्यापक संतोष चव्हाण, इंग्रजी प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका नीलिमा शिंदे, पर्यवेक्षिका वैशाली पारधी, स्वाती पाटील, अजित सोनवणे, कैलास म्हात्रे तसेच विद्यार्थी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.




# पनवेलमध्ये आरोग्यकिरण हेल्थ एक्स्पो

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आरोग्यकिरण व कृष्णा इव्हेंटच्या संयुक्त विद्यमाने पनवेल शहरातील गोखले सभागृहात ४ व ५ जानेवारी आरोग्यकिरण हेल्थ एक्स्पो २०२५ आयोजित करण्यात आले आहे. याचे उद्घाटन ४ जानेवारीला सायंकाळी ५ वाजता पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या हस्ते, तर ५ जानेवारीला आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत धन्वन्तरी यागचे लोकार्पण होईल.

या कार्यक्रमात विविध आरोग्य आवश्यक भेसळ रहित उत्पादन व पदार्थांचे प्रदर्शन तसेच लोकांच्या उत्तम आरोग्याच्या भवितव्याकरिता राष्ट्रीय चिकित्सा सेवा रत्न २०२४ सन्मानित प्रसिद्ध वैद्य नीरज दांडेकर यांच्यामार्फत बाल आरोग्य रहस्य, कॉर्पोरेट जीवनशैली आणि आयुर्वेद व स्वयंपाकगृहाचे आरोग्य तीन व्याख्याने आयोजित करणार आली आहेत.

# बीसीटी लॉ कॉलेजच्या विद्यार्थ्यांची व्यावहारिक प्रशिक्षणासाठी खांदेश्वर पोलीस ठाण्यास भेट

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

३ जानेवारी २०२५ रोजी भागुबाई चांगू ठाकूर विधी महाविद्यालय, नवीन पनवेल येथील पहिल्या वर्षाच्या एलएलबी विद्यार्थ्यांनी खांदेश्वर पोलीस स्टेशनला प्रॅक्टिकल ट्रेनिंग एआय कार्यक्रमाच्या अंतर्गत भेट दिली. या शैक्षणिक भेटीचा आयोजन सहाय्यक प्राध्यापक अनम मेहंदीकर आणि सानिका पात्रे यांनी प्राचार्य सानवी देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली केले.



या भेटीचा उद्देश विद्यार्थ्यांना कायदा अंमलबजावणीच्या वास्तविक कार्यप्रणालीबद्दल माहिती देणे होता. विद्यार्थ्यांचे स्वागत पोलीस अधिकाऱ्यांनी केले आणि त्यानंतर पोलिस विभागाची रचना, पदानुक्रम आणि प्रमुख कार्याबद्दल माहितीपूर्ण शिबीर घेतले. विद्यार्थ्यांना भेटीच्या दरम्यान, रिसेप्शन, महिलांच्या मदतीचा कक्ष आणि पुरावा साठवण क्षेत्र यांसारख्या विविध विभागांची पाहणी केली. त्यांना पुरावा हाताळणीचे महत्त्व आणि अटक व ताब्यात घेण्याच्या कायदेशीर प्रक्रियेचे ज्ञान मिळाले. भेटीचा एक महत्त्वपूर्ण भाग म्हणजे पोलीस अधिकाऱ्यांद्वारे दिलेले एक आकर्षक सत्र, ज्यामध्ये विद्यार्थ्यांनी कायदेशीर प्रक्रिये, मानवाधिकार आणि कायदा अंमलबजावणीच्या आव्हानांवर चर्चा केली. या संवादाने विद्यार्थ्यांना त्यांच्या सैद्धांतिक कायदेशीर ज्ञानाला वास्तविक कायदा अंमलबजावणीच्या अनुभवांसोबत जोडण्याची संधी दिली.

## सायबर फ्रॉड जनजागृती व्याख्यान

याव्यतिरिक्त वरिष्ठ पोलीस निरीक्षक स्मिता धाकें, निरीक्षक बळवंत पाटील यांनी सायबर फसवणूक विषयावर एक अत्यंत माहितीपूर्ण व्याख्यान दिले. यामध्ये विद्यार्थ्यांना सायबर गुन्ह्यांच्या वाढता धोका, फसवणुकीचे प्रकार आणि प्रतिबंधात्मक उपाय याबद्दल मार्गदर्शन करण्यात आले. या सत्राने विद्यार्थ्यांना डिजिटल युगातील उदयोन्मुख गुन्ह्यांच्या कायदेशीर पैलूंचा समज वाढवला. ही भेट विद्यार्थ्यांना कायदा अंमलबजावणीची कार्यपद्धती आणि कायदेशीर प्रक्रियेच्या बाबतीत मूल्यवान प्रत्यक्ष अनुभव प्रदान करणारी होती, ज्यामुळे त्यांच्या कायदेशीर शिक्षणाला महत्त्वपूर्ण भर पडली.

## संपादकीय

# असे हल्ले रोखायचे कसे?

न्यू ऑर्लिन्स आणि जर्मनीतील हल्ल्याची पद्धत एकच होती. एखाद्या गर्दीच्या ठिकाणी सुसाट वेगाने वाहन घुसवून जमेल तितक्या लोकांचा बळी घ्यायचा ही ती पद्धत. अशा हल्ल्यासाठी कुठल्याही वेगळ्या शस्त्राची गरज लागत नाही. मग सुरक्षा यंत्रणांच्या तपासणीत हल्लेखोर हल्ल्याच्या आधीच कसे सापडणार? अशातऱ्हेचे हल्ले कुठेही घडवले जाऊ शकतात या विचारानेच जगभरातील देशांची चिंता वाढली आहे.

**अमेरिकेतील न्यू ऑर्लिन्समध्ये मंगळवारी मध्यरात्रीनंतर नववर्ष स्वागताचा जल्लोष करणाऱ्या गर्दीत व्हॅन घुसवून केलेल्या हल्ल्यातील बळींची संख्या १५वर पोहोचली असतानाच अमेरिकेत आणखी दोन हल्ले झाले आहेत. लास वेगासमधील ट्रम्प हॉटेलजवळ टेस्ला सायबर–ट्रकच्या स्फोटात एक ठार, सात जण जखमी झाले तर न्यूयॉर्कमधील क्वीन्स येथील अमेझुरा नाइट क्लबमध्ये गोळीबारात ११ जण जखमी झाले. नववर्षाच्या पहिल्याच दिवशी २४ तासांत झालेल्या या तीन हल्ल्यांनी अमेरिका तर हादरलीच, परंतु अवघ्या जगभरात या घटनांविषयी चिंता व्यक्त होते आहे. सर्व तऱ्हेच्या अत्याधुनिक सुरक्षा यंत्रणा राबवून नववर्षाचा जल्लोष करणाऱ्या गर्दीच्या सुरक्षिततेची खबरदारी घेतली गेल्यानंतरही न्यू ऑर्लिन्समधील दहशतवादी हल्ला झाला आहे. रोजच्या वापरातील एखादी कार वा ट्रकचा वापर दहशतवादी हल्ल्यासाठी होणार असेल तर अत्याधुनिक सुरक्षा यंत्रणा कुचकामी ठरतात हे यानिमित्ताने पुन्हा समोर आले आहे. न्यू ऑर्लिन्समधील व्हॅन हल्ला 'आयएस' या दहशतवादी संघटनेशी संबंधित हल्लेखोराने केल्याचे तपासात स्पष्ट झाले आहे. पोलिसांच्या गोळीबारात हल्लेखोर ठार झाला असला तरी त्याच्या वाहनात 'आयएस'चा झेंडा सापडला. आश्चर्याची बाब म्हणजे, या हल्लेखोराने अमेरिकेच्या लष्करात अनेक वर्षे काम केल्याचे तसेच हल्ल्याच्या आधी त्याने सोशल मीडियावर व्हिडिओ पोस्ट केल्याचेही सांगितले जाते आहे. या व्हॅन हल्ल्यापाठोपाठच लास वेगासमधील ट्रम्प हॉटेलजवळ हल्ला झाल्याने दोन्हींत काही संबंध आहे का याचाही तपास सुरू आहे. यापूर्वी जर्मनीतील ख्रिसमस बाजारपेठेतील हल्ल्यातही पाच जण ठार झाले आहेत. जगभरातील देशांत यामुळे इस्लामी लोकांविषयी संशय वाढण्याची शक्यता आहे. शिवाय, अन्य देशांतून येऊन अमेरिकेत स्थायिक होणारे 'गोरे नसलेले' लोक या देशाशी निष्ठा राखू शकतात का, याविषयीचा वादही उफाळून येण्याची शक्यता आहे. जगभरातील इतरही अनेक देशांमध्ये अशा बाहेरून येणाऱ्या लोकांविषयी अविश्वासाची भावना बळावते आहे. त्यातही विशेषत: इस्लामी लोकांना असलेला विरोध आणखीनच टोकदार झाल्यास त्याला कोण जबाबदार आहे? इस्लामी लोकांनी, संस्था–संघटनांनी अशा हल्ल्यांचा जोरदार निषेध करणे आवश्यक नाही का? दहशतवादी हल्ल्यांच्या केंद्रस्थानी असलेले हल्लेखोर हे बहुदा इस्लामी असतात ही भावना बळावली तर त्याला जबाबदार हे इस्लामी हल्लेखोरच असतील. अमेरिकेचे अशा हल्ल्यांनी काहीही नुकसान होत नाही. काही निष्पाप नागरिकांचा बळी मात्र जातो. मग हे हल्लेखोर अमेरिकेत असे हल्ले का करत असावेत? सध्या इजिप्त, सीरिया, लेबनॉन, येमेन, इराक आणि इराण या पश्चिम आशियातील कित्येक इस्लामी देशांमध्ये शांतता नाही. इस्रायल–पॅलेस्टाइन संघर्ष याच्या मुळाशी असला तरी त्याबद्दल अमेरिकेला कसे जबाबदार धरता येईल? अमेरिकेने इस्रायलला रोखले नाही म्हणून त्या देशातील निरपराध नागरिकांचा बळी घेण्याचे समर्थन कसे करता येईल? अमेरिकेतील या दहशतवादी हल्ल्यांमुळे जगभरात इस्लामी नागरिकांना संशयाला व रोषाला तोंड द्यावे लागेल हे मात्र निश्चित.**

# अंबा नदीला प्रदूषणाचा विळखा



सुधागड तालुक्यासह खालापूर, रोहा व पेण आदी तालुक्यातून वाहणारी व अनेकांची जीवनवाहिनी असलेल्या अंबा नदीतून पाली शहराला पाणीपुरवठा होतो तसेच सुधागड तालुक्यातील अंबा नदीशेजारील गावांतील लोक व प्राणीदेखील याच पाण्याचा पिण्यासाठी व वापरासाठी वापर करतात, मात्र सध्या अंबा नदीचे पाणी निर्माल्य पिशव्या, कचरा, शेवाळ व केमिकलचा तवंग यामुळे प्रदूषित झाले आहे. पाण्यावर शेवाळ व रसायनामुळे हिरवट व लालसर तवंग आला आहे. त्यामुळे तालुक्यातील नागरिक, भाविक व प्राण्यांचे आरोग्य धोक्यात आले आहे.

पावसाळ्यानंतर अनेक ठिकाणी बंधारे कार्यान्वित करुन अंबा नदिचे पाणी अडविले जाते. त्यामुळे या साठलेल्या पाण्यात सध्या मोठ्या प्रमाणात हिरवळ तयार झाली आहे. तसेच नदीतून वाहून आलेले प्रदूषित व सांडपाणी पुढे वाहून न जाता येथेच साठून राहते. रासायनिक कंपनीमधून टाकाऊ रसायन हे थेट आंबा नदीत सोडले जाते तसेच रसायन व सांडपाण्याबरोबरच कचरा आणि घाण देखिल साठते. नदीवर महिला कपडे व भांडी धुतात. तसेच नदित टाकलेले निर्माल्य कुजल्याने देखिल पाणी खराब होते. परिणामी ते अधिक दुषित झाले आहे. पाण्याला उग्र स्वरूपाची दुर्गंधी येते, चवही खराब लागते. पाणी प्रदुषित झाल्याने नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर झाला आहे. परिणामी बहुसंख्य नागरिक अधिकचे पैसे खर्च करुन पिण्याच्या पाण्यासाठी बाटलीबंद पाण्याचा आधार घेतात.

**पालीकर व भाविकांना दूषित पाणी पुरवठा**

अंबा नदीच्या पाण्यावर कोणतीही शुद्धीकरण व क्लोरीनेशनची प्रक्रिया न करता थेट पालीकरांना पुरविले जाते. अशा प्रकारे कित्येक वर्षे पालिकरांच्या आरोग्याशी खेळले जात आहे. पाली हे अष्टविनायक क्षेत्र आहे. येथे रोज हजारो भाविक येत असतात. पालीची स्थायी लोकसंख्या देखील पंधरा हजारहून अधिक आहे. अशा परिस्थितीत भाविक व नागरिकांना

**खबरबात**
धम्मशील सावंत

नाईलाजाने हे गढूळ व खराब पाणी प्यावे व वापरावे लागत आहे. आत्तापर्यंत येथील नळांतून चक्क जिवंत साप, खुबे, शिंपले, मासे आणि किडे अनेकवेळा बाहेर आले आहेत. गाळ, चिखल आणि शेवाळ येणे हे तर नेहमीचेच आहे. शिवाय पाणीपुरवठादेखील अनियमित होतो.

**शुद्ध पाणी योजनेचा विसर**

पाली शुद्ध पाणी योजना ही १९७४ साली मंजूर झाली आहे. सध्यास्थितीत तिचा एकूण खर्च आता २७ कोटींवर गेला आहे, मात्र ही शुद्ध पाणीपुरवठा योजना कारभारात अडकली आहे. राजकीय हेवेदावे आणि प्रशासकीय बाबी यामध्ये ही योजना अडकल्यामुळे पालीकर अजुनही शुद्ध पाण्याच्या प्रतिक्षेत आहेत. निवडणुकीच्या प्रचारात शुद्ध पाणी योजना कार्यान्वित करू असे आश्वासन देतात, मात्र अजून काहीच झालेले नाही.

**शुद्ध पाणी योजना कार्यान्वित व्हावी यासाठी ताबडतोब संबंधित विभागाची मीटिंग घेणार आहे. तसेच ज्या कंपन्या रसायनमिश्रित पाणी नदीमध्ये सोडून प्रदूषण करत आहेत त्यांना प्रदूषण नियंत्रण मंडळाद्वारे नोटीस पाठवण्यास सांगितले जाईल. अंबा नदीचे पाणी स्वच्छ सुंदर राहील यासाठी सर्वांनी नियमांचे पालन करणे आवश्यक आहे.**

**–रविशेठ पाटील,**
**आमदार, पेण–सुधागड–रोहा**

**सुधागड तालुक्यातील पाली, राबगाव, आंबोले, रासळ, कानसळ, हेदवली, जांभूळपाडा आदी गावाजवळच अंबा नदीच्या काठावर अनेक रासायनिक व इतर कंपन्या उभ्या राहिल्या आहेत. यातील काही कंपन्यातील दुषित रसायनयुक्त पाणी थेट अंबा नदीच्या पात्रात सोडण्यात येते. यामुळे तालुक्यातील अंबा नदीच्या पाण्यावर अवलंबून असणाऱ्या लोकांचे जनजीवन धोक्यात आले आहे. दुषित पाणी हे पिण्यायोग्य नसल्याने लोक, जनावरे यांच्या प्रकृतीवर प्रतिकूल परिणाम होत आहे. अशा काही कंपन्यांवर प्रदूषण नियामक मंडळाने याबाबत योग्य कारवाई करावी.**

**–केतन विठ्ठल म्हसके,**
**उपाध्यक्ष, शिवऋण प्रतिष्ठान महाराष्ट्र, रा. वावे – सुधागड**

**अंबा नदी जॅकवेलजवळ असलेला कचरा ताबडतोब काढून घेण्यात येईल. शुद्ध पाणी योजना लवकरात लवकर यावी यासाठी पाठपुरावा केला जात आहे. नागरिकांनीही नदीचे प्रदूषण होणार नाही याची खबरदारी घ्यावी. पाणी उकळून व गाळून प्यावे. कंपन्यांनी आपले रसायन मिश्रित सांडपाणी थेट नदीत सोडू नये.**

**–प्रणाली शेळके,**
**नगराध्यक्ष, पाली**



## बदलते तंत्रज्ञान

# खासगी फाईल्ससाठी विंडोजचे 'हे' फिचर वापरा

सिक्रेट फोल्डर विंडोज हे सर्वाधिक वापरले जाणारे ऑपरेटिंग सिस्टिम आहे. यामध्ये अनेक फीचर्स आहेत



जे तुम्हालाही माहिती नसतील. तुम्हाला काही फाईल्स गुप्त ठेवायच्या असल्यास तुम्ही एका खास ट्रिकद्वारे त्या गुप्त ठेवू शकता. विशेष म्हणजे ज्या फोल्डरमध्ये तुम्ही या फाईल्स ठेवाल त्या फोल्डरचे नाव आणि त्याचे आयकन हे कोणालाही दिसणार नाही. तो होमपेजवर किंवा फोल्डरमध्ये असेल. जेव्हा तुम्ही त्यावर माऊस न्याल तेव्हाच तो तुम्हाला तिथे असल्याचे लक्षात येईल. हे फोल्डर कसे तयार करायचे? जाणून घेऊया.

**अदृश्य फोल्डर तयार करण्यासाठी पुढील स्टेप्स फॉलो करा**

नाव नसलेले फोल्डर तयार करण्यासाठी डेस्कटॉपवर कुठेही राइट क्लिक करा आणि न्यूवर क्लिक करून फोल्डरवर क्लिक करा. फोल्डर तयार झाल्यावर त्यावर पुन्हा राइट क्लिक करा आणि कंटेक्स्टच्युअल ऑपश्नमध्ये रिनेम निवडा.

पुढच्या स्टेप्ससाठी तुमच्याकडे पूर्ण आकाराचा किबोर्ड (उजवीकडे नमपॅड असेलेला किबोर्ड) आवश्यक असेल. अल्ट + ०१६० (ब्रेक स्पेस पडू नये यासाठी अल्ट कोड शॉर्टकट) टाइप करा आणि एन्टर दाबा. आता तुम्हाला नाव नसलेले फोल्डर दिसेल.

**आयकन हटवण्यासाठी पुढील स्टेप्स फॉलो करा**


फोल्डरचे आयकन हटवण्यासाठी पुन्हा फोल्डरवर राइट क्लिक करा आणि प्रॉपर्टीमध्ये जा. येथे तुम्ही कस्टमाइज टॅबवर नेविगेट करू शकता आणि नंतर चेंज आयकन हा सर्वात तळाशी असलेला पर्याय निवडा. डिफॉल्ट पर्यायांपैकी उजवीकडे स्क्रोल करा, तुम्हाला चार ब्लँक आयकन दिसून येतील, यापैकी कोणतेही निवडा.

आता तुमच्याकडे नाव आणि आयकन नसलेले फोल्डर असेल. जेव्हा तुम्ही फोल्डरवर क्लिक कराल किंवा त्यास सिलेक्शन विंडोमध्ये समाविष्ट कराल किंवा त्यावर माऊस न्याल तेव्हा ते तुम्हाला दिसून येईल. तुम्ही असा फोल्डर वापरत असल्यास त्यास डेस्कटॉपच्या कॉर्नरवर ठेवा.

अशा प्रकारे अनेक सुविधा कम्प्युटर, विंडोमध्ये उपलब्ध असतात, ज्यांच्याबद्दल वापरकर्त्यांना माहिती नसते. त्यांचा वापर चांगल्या पद्धतीने करता येतो.

# संगीत नाटककार विद्याधर गोखले

विद्याधर संभाजीराव गोखले यांचा आज स्मृतिदिन. विद्याधर गोखले हे मराठी पत्रकार व संगीत नाटककार होते. त्यांचा जन्म ४ जानेवारी १९२४ रोजी अमरावती या ठिकाणी झाला. अमरावतीत पदवीपर्यंत शिक्षण घेतल्यानंतर १९४४ मध्ये ते मुंबईला आले.



**निमित्त**

विद्याधर संभाजीराव गोखले यांचा आज स्मृतिदिन. विद्याधर गोखले हे मराठी पत्रकार व संगीत नाटककार होते. त्यांचा जन्म ४ जानेवारी १९२४ रोजी अमरावती या ठिकाणी झाला. अमरावतीत पदवीपर्यंत शिक्षण घेतल्यानंतर १९४४ मध्ये ते मुंबईला आले. जनरल एज्युकेशन सोसायटीच्या कुर्ला येथील शाळेत इंग्रजी, मराठी, संस्कृत विषयाचे त्यांनी अध्यापन केले. त्यानंतर त्यांनी दैनिक लोकसत्तामध्ये बरीच वर्षे पत्रकारिता केली व त्यानंतर पाच वर्षे त्यांनी संपादक म्हणूनही काम पाहिले.

पत्रकारिता करीत असताना वृत्तपत्राबरोबरच त्यांची लेखणी नाट्यलेखन करू लागली. संगीत नाटकांच्या परंपरेचा वारसा त्यांनी पुढे चालविला. त्यांनी एकूण १८ नाटके लिहिली. त्यापैकी काही ऐतिहासिक, पौराणिक, तर काही सामाजिक विषयांवर आधारित आहेत. त्यांची संगीत नाटके तर लोकप्रिय झालीच, पण त्यातील पदांनी आजपर्यंत मराठी मनाला भुरळ घातली आहे.

'झंझावात' (कादंबरी), नाटके– 'संगीत अमृत झाले जहराचे' (१९६५), 'इब्राहिमखान गारदी', 'संगीत चमकला ध्रुवाचा तारा' (१९६९), 'संगीत जय जय गौरीशंकर' (१९६६), 'जावयाचे बंड', 'संगीत पंडितराज जगन्नाथ' (१९६०), 'बरसते सूर्यातून चंद्रिका', 'बावनखणी' (१९८३), 'संगीत मदनाची मंजिरी' (१९६५), 'संगीत मंदारमाला' (१९६३), 'संगीत मेघमल्हार' (१९६७), 'रूपरंजनी', 'राणी रूपमती', 'साक्षीदार' (१९६०), 'सुंदरा मनामध्ये भरली', 'संगीत सुवर्णतुला' (१९६०), 'संगीत स्वरसम्राज्ञी' (१९७३) इत्यादी पुस्तके त्यांनी लिहिली. त्यांचे लेखन मात्र गांभीर्यापेक्षा रंजकतेकडे अधिक झुकणारे होते. राजकीय लेखनही ते साहित्यिक शैलीने नटवत. लेखन सालंकृत करण्यावर त्यांचा अधिक भर असे.

संस्कृत व उर्दू साहित्याचा त्यांचा चांगला अभ्यास होता. त्यातील वचने व कल्पना ते आपल्या अग्रलेखात वापरत. सरळ, सुबोध अशा त्यांच्या लेखनात विनोदाचा शिडकावाही असे. प्रक्षोभक लिहिण्यापेक्षा मुद्यांकडे, भाषेच्या व शब्दांच्या नेटक्या वापराकडे संपादकाने लक्ष द्यायला हवे, असे त्यांचे मत होते. अशा या प्रतिभावान नाटककाराचे २६ सप्टेंबर १९९६ रोजी निधन झाले.

विद्याधर संभाजीराव गोखले हे मराठी पत्रकार व संगीत नाटककार होते. मराठी वर्तमानपत्र दैनिक लोकसत्ताचे ते संपादक होते. विद्याधर गोखले यांच्या वरिल संस्कार हे पत्रकारिता यालाच पोषक होते. विद्येवर,ज्ञानावर त्यांचा विश्वास होता. ते व्यासंगी होते.

विद्याधर गोखले यांचे लेखन मात्र गांभीर्यापेक्षा रंजकतेकडे अधिक झुकणारे होते. राजकीय लेखनही ते साहित्यिक शैलीने नटवत लेखन सालंकृत करण्यावर त्यांचा अधिक भर असे. संस्कृत व उर्दू साहित्याचा त्यांचा चांगला अभ्यास होता. त्यातील वचने व कल्पना ते आपल्या अग्रलेखात वापरत. सरळ, सुबोध अशा त्यांच्या लेखनात विनोदाचा शिडकावाही असे. **(साभार : इंटरनेट)**


## बातमीतील बात




## आरोग्य प्रहर

# हिवाळ्यात निरोगी राहण्यासाठी 'हे' पदार्थ आहारात असावे

हळूहळू सगळीकडे थंडीचे प्रमाण वाढत आहे. जसजसे हवामान बदलते त्याप्रमाणे हिवाळ्यात होणाऱ्या आजारांची



शक्यता वाढते. हिवाळ्यात धुक्याचे प्रमाण वाढते त्यामुळे प्रदूषणात आणखी भर पडते. अशात श्वसनाचा त्रास असणाऱ्यांची समस्या आणखी वाढू शकते. दम्याचा त्रास असणाऱ्यांना तर या दिवसांमध्ये घराबाहेर पडणे कठीण होते. श्वसनाचा त्रास नसऱ्यांनादेखील या वातावरणामध्ये हा त्रास होऊ शकतो. त्यामुळे सर्वांनीच या दिवसांमध्ये तब्येतीची विशेष काळजी घेणे गरजेचे असते. सर्दी, खोकला, ताप अशा आजरांमुळेही अनेकजण त्रस्त असतात. त्यामुळे आरोग्याची काळजी घेण्याचा सल्ला दिला जातो.

हिवाळ्यात निरोगी राहण्यासाठी काही पदार्थ मदत करू शकतात. कोणते आहेत ते पदार्थ जाणून घ्या...

**गूळ** : हिवाळ्यात होणाऱ्या वातावरणातील बदलामुळे अनेकदा रक्ताभिसरणाचा वेग मंदावतो. यासाठी गूळ खाण्याचा सल्ला दिला जातो. गूळ खाल्ल्याने शरीरात उष्णता निर्माण होते. गुळात आढळणारे लोह रक्ताभिसरणाची गती वाढवते आणि रक्तवाहिन्या निरोगी ठेवण्यास मदत करते. तसेच गूळ छाती जड होण्याच्या समस्येपासून, सतत पोटात गॅस होत असेल तर त्यापासून सुटका मिळवण्यासाठी गूळ फायदेशीर ठरतो.

**आवळा** : आवळ्यात 'विटामिन सी'सारखे रोगप्रतिकारक शक्ती वाढवणारे गुणधर्म आढळतात, ज्यामुळे हिवाळ्यात होणाऱ्या इन्फेक्शनपासून वाचण्यासाठी मदत मिळते.

**सुका मेवा** : काजू, बदाम, अक्रोड अशा सुक्या मेव्यामध्ये निरोगी राहण्यासाठी मदत करणारे आवश्यक पोषकतत्व आढळतात. बदामामध्ये भरपूर प्रमाणात विटामिन इ, अँटिऑक्सिडंट्स, मॅग्नेशियम आढळते तर अक्रोडमध्ये 'ओमेगा ३' आढळते. याच्या सेवनामुळे शरीरासाठी अयोग्य असणारा कोलेस्ट्रॉल कमी करण्यास आणि रक्तातील साखरेची पातळी नियंत्रण ठेवण्यासही मदत मिळते. तसेच नियमित सुका मेवा खाल्ल्याने शरीरात उष्णता टिकून राहते.

**कंदमुळे असणाऱ्या भाज्या** : गाजर, रताळे, बीट, बटाटे यांसारख्या कंदमुळे असणाऱ्या भाज्या आरोग्यासाठी फायदेशीर मानल्या जातात. त्यामुळे हिवाळ्यात निरोगी राहण्यासाठी या भाज्या खाण्याचा सल्ला दिला जातो.

**(टीप : येथे देण्यात आलेली माहिती घरगुती उपचार व सामान्य ज्ञानावर आधारित आहे. अधिक माहितीसाठी तज्ञांचा सल्ला घ्या.)**

# विज्ञान प्रदर्शनातून उद्याचे वैज्ञानिक घडतील -आमदार रविशेठ पाटील

**सुधागड : प्रतिनिधी**

आदिवासी भागातील विद्यार्थ्यांमध्ये सुप्त कला गुण असतात. योग्य संधी उपलब्ध झाल्यास ते विद्यार्थी आपली योग्यता सिद्ध करतात. विज्ञानामुळेच विद्यार्थ्यांच्या कल्पनाशक्तीचा आणि सृजनशीलतेचा विकास होतो. देशाचे भवितव्य घडवणारे ग्रामीण भागातील बालवैज्ञानिक अशाच प्रदर्शनातून पुढे येतील, असा विश्वास ५२ व्या सुधागड तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनाचे उद्घाटन प्रसंगी आमदार रविशेठ पाटील यांनी व्यक्त केला.



सुधागड पंचायत समिती शिक्षण विभाग, विज्ञान गणित अध्यापक मंडळ व श्री राज एज्युकेशन सेंटर इंग्रजी माध्यम शाळा घोटवडे यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ५२ व्या तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनाचे उद्घाटन प्रसंगी आमदार रवींद्र पाटील बोलत होते. यावेळी श्रीराज एज्युकेशन सेंटरचे व्यवस्थापकीय अधिकारी डॉ. जयंत जोशी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यक्रमाला तहसीलदार उत्तम कुंभार, गटविकास अधिकारी लता मोहिते, घोटवडे गावाचे सरपंच पांडुरंग झोरे, प्राचार्य युवराज महाजन, विज्ञान अध्यापक मंडळाचे अध्यक्ष शांताराम बेलोशे, गणित अध्यापक मंडळाचे अध्यक्ष मंदार सिनकर, गटशिक्षणाधिकारी साधूराम बांगारे, शाळेच्या प्राचार्य श्रीमती वैशाली पांडे, वरिष्ठ विस्तार अधिकारी नवनाथ साबळे, तालुक्यातील सर्व केंद्रप्रमुख, मुख्याध्यापक व प्राचार्य उपस्थित होते.

आदिवासी मुलांची प्रगती हेच ध्येय उराशी बाळगून या शाळेची प्रगती पाच विद्यार्थ्यांपासून ते नऊशे विद्यार्थीपर्यंत पोहोचली आहे. विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास करण्याचा ध्यास शाळेचा असून पालकांचे मोलाचे सहकार्यही मिळत आहे, असे प्रतिपादन श्रीराज एज्युकेशन सेंटरचे प्रशासकीय अधिकारी डॉ. जयंत जोशी यांनी केले.

गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये भरतनाट्यम स्पर्धेत दोनदा नोंद झालेल्या श्रीराज एज्युकेशन सेंटर घोटवडे येथील विद्यार्थिनी वंशिता नाईक हिचा सत्कार आमदार रवी पाटील यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी बोलताना आमदार पाटील म्हणाले की, आदिवासी समाजाच्या उन्नतीसाठी माननीय पप्पाजी व डॉ. जयंत जोशी यांच्या प्रेरणेने सुरू झालेल्या या शाळेला 'माझी शाळा सुंदर शाळा' या स्पर्धेत रायगड जिल्ह्यात प्रथम क्रमांक मिळाला आहे. याचे कौतुक व अभिनंदन केले.

तहसीलदार उत्तम कुंभार यांनी विद्यार्थ्यांमधील वैज्ञानिक दृष्टिकोन आणि त्याला अनुसरून निर्माण होणाऱ्या कलाकृतींना सादरीकरणाची संधी मिळावी आणि यातून संशोधनाची आवड निर्माण होते, असे सांगितले विद्यार्थ्यांनी विज्ञानाची कास धरून विविध तंत्रज्ञानाचा वापर करून प्रयोग सादर करावेत आणि या प्रयोगातून एखादा शास्त्रज्ञ बनावा, यासाठी हे विज्ञान प्रदर्शन भरवण्यात आले आहे. या विज्ञान प्रदर्शनात ७० प्रातिकृतींचा सहभाग आहे. मागील वर्षाच्या तुलनेत विद्यार्थ्यांचा सहभाग वाढला आहे. दुर्गम भागातील शाळांनीसुद्धा विज्ञान प्रदर्शनात सहभाग नोंदविला आहे, अशी माहिती गटशिक्षणाधिकारी साधूराम बांगारे यांनी प्रास्ताविकात दिली.कार्यक्रमाचे सूत्र संचालन रूपाली मात्रे व श्वेता देशमुख यांनी केले.

# मद्यपी ८२ वाहनचालकांवर पोलिसांची धडक कारवाई

**अलिबाग : प्रतिनिधी**

नववर्षाच्या स्वागतासाठी रायगड जिल्ह्यात येऊन मद्यपान करून वाहन चालवणार्यांवर रायगड पोलीसांनी कारवाई केली. ३१ डिसेंबर रोजी रात्री मद्यपान करून वाहन चालवणार्यां ८२ वहान चालकांवर पोलीसांनी कारवाई केली. महाड विभागात सर्वाधिक २४ जणांविरोधात गुन्हे दाखल करण्यात आले. नाताळच्या आठ दिवसांच्या कालावधीत वाहतुकीचे नियम मोडणार्यांविरोधात कारवाई ४५ लाख रुपयांचा दंड वसूल केला.

सरत्या वर्षाला निरोप देण्यसाठी व नवीन वर्षाचे स्वागत करण्यासाठी रायगड जिल्ह्यात येणार्या पर्यटकांवर पोलीसांची नजर होती. ३१ डिसेंबर रोजी मद्यपान करून गाडी चालवणार्यांवर कारवाई करण्याचा इशारा रायगडचे पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी दिला होता. त्यागड दुर्लक्ष करून मद्यप्रशान करून वाहन चालविणार्या वाहनचालकांवर पोलीसांनी कारवाई करत गन्हे दाखल केले .

थर्टी फर्स्टच्या अनुषंगाने जिल्ह्यात कारवाईसाठी पोलीसांकडून १८ ठिकाणी ब्रेथ अँनलाझर मशीन तैनात ठेवण्यात आली होती. या ठिकाणी नाका बंदी करून पोलीसांनी मद्यपी वाहन चालकांची तपासणी केली. यात ८२ जण मद्यपान करून गाडी चालवत असल्याचे आढळून आले. त्यांच्यावर मोटर वाहन कायद्यातील तरतुदी अंतर्गत गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. यात महाड विभागात सर्वाधिक २४, पेण विभागात १५, अलिबाग विभागात १०, खालापूर विभागात ११, रोहा विभागात ९, माणगाव विभागात ६, कर्जत विभागात ३ तर श्रीवर्धन विभागात ३ जणांवर कारवाई करण्यात आली आहे.

याशिवाय नाताळच्या सुट्टीत (२४ डिसेंबर ते १ जोनवारी) सात दिवसात वाहतूक पोलीसांनी व्यापक कारवाई करत ५ हजार १२८ जणांविरोधात वाहतुकीचे नियम मोडल्या प्रकरणी गुन्हे दाखल केले आहेत. त्यांच्याकडून ४५ लाख रुपयांचा दंड आकारण्यात आला आहे. मोटर सायकल वरून तिघे प्रवास करणार्यां १६२ जणांवर, विना हेल्मेट वाहन चालवणार्या १९६ जणांवर , तर विना सिट बेल्ट वाहन चालवणार्या ८२३ जणांवर कारवाई करण्यात आली आहे.वर्षभरात १८३ मद्यपी वाहन चालकांवर कारवाई करण्यात आली.

मागील चार वर्षापेक्षा यंदा सर्वात जास्त कारवाया करण्यात आल्या आहेत. २०२१मध्ये ४७, २०२२ साली ७४, २०२३मध्ये ९५, तर २०२४ साली १८३ जाणांवर कारवाई करण्यात आली.

# रायगड पोलिसांनी ९९ टक्के गुन्हे केले उघड : खुनाचे गुन्हे वाढले, तर घरफोडी, चोरीचे प्रमाण घटले

**अलिबाग (प्रतिनिधी) :**

रायगड जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यक्षेत्रात २०२४ या वर्षामध्ये दाखेल झालेल्या गुन्ह्यांपैकी ९९ टक्के गुन्ह्यांची उकल करण्यात रायगड पोलीसांना यश आले आहे.२०२४ मध्ये एकूण २९३३ गुन्हे दाखल झाले होते. त्यापैकी २९०१ गुन्ह्याचीं उकल करण्यात आली आहे. गुन्हे शाबित करण्याचे प्रमाण मात्र घटले आहे. खुनाचे गुन्हे वाढले असून घरफोडी, चोरीचे प्रमाण घटले आहे

रायगड पोलीस अधीक्षक कार्यक्षेत्रात २०२४ या वर्षात ३२ खुनाचे गुन्हे दाखल करण्यात आले होते. त्यापैकी ३० गुन्हे उघड करण्यात पोलीसांना यश आले. २०२३ च्या तुलनेंत खुनांच्या गुन्ह्यांमध्ये ६ ने वाढ झाली आहे. २०२३ मध्ये खुनाचे २६ गुन्हे दाखल झाले होते. २०२४ मध्ये २७ खुनाच्या प्रयत्नाचे गुन्हे दाखल झाले होते. हे सर्व गुन्हे उघड करण्यात पोलिसांना यश आले आहे.

मागील वर्षाच्या तुलनेत २०२४ या वर्षात महिलांवरील गुन्ह्यांमध्ये वाढ झाली आहे. २०२४ या वर्षात महिलांवर बलात्काराचे १०७ गुन्हे दाखल होते. हे गुन्हे उघडकीस आणण्यात पोलिसांना यश आले आहे. २०२३ मध्ये बलात्काराचे १०० गुन्हे दाखल झाले होते. २०२४ मध्ये विनयभंगाचे १५७ गुन्हे दाखल झाले होते. पैकी १५२ गुन्हे उघडीस आले. २०२३मध्ये विनयभंगाचे १५२ गुन्हे दाख झाले होते.

२०२४ साली दरोड्याचा १ गुन्हा दाखल झाला होता, हा गुन्हा उघडकीस आला. ३२ जबरी चोरीचे गुन्हे दाखल आहेत. त्यापैकी २६ गुन्हे उघड करण्यास यश आले. घरफोडीचे १६१ गुन्हे दाखल होते. पोलिसांनी ७५ गुन्हे उघड केले. सन २०२३ च्या तुलनेत १४ ने गुन्ह्याचे कमी झाले आहेत. चोरीचे ३६५ गुन्हे दाखल असून, त्यापैकी १९५ गुन्हे उघड झाले आहेत. जबरी चोरी, घरफोडी व चोरीचे गुन्हे कमी दाखल झाले असले तरी गुन्हे उघड करण्याचे प्रमाण देखली कमी आहे. दंगलीचे ११४ गुन्हे दाखल होते, पैकी ११४ गुन्हे उघड करण्यास यश आले आहे. दुखापतीचे ३७४ गुन्हे दाखल करण्यात आले सर्व गुन्हे उघड झाले आहेत. अपघातात निधन झालेल्याचे २४८ गुन्हे घडले होते त्यापैकी २२४ उघड झाले. इतर ७९२ गुन्हे दाखल झाले होते त्यापैकी ७४४ उघड झाले. जुगाराचे ११८ गुन्हे दाखल करण्यात आले होते. ते सर्व उघड झाले. दारू बंदीचे १०५९ गुन्हे दखल करण्यात आले होते.

२०२४ या वर्षात अपहरणाचे १३० गुन्हे दाखल झाले होते. त्यापैकी १२५ गुन्हे उघड् झाले. ९७ मुली तर ३५ मुलांचे अपहरण करण्यात आले होते. अपहरण करण्यात आलेल्या ७ मुलीं अजून सापडलेल्या नाहीत.

२०२४मध्ये ११८ जुगार अड्यांवर कारवाई करून ५६ लाख ५४० रूपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. दारूबंदीच्या १०५९ कारवाया करून ८४ लाख ५५ हजार ५८५ रूपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. अंमली पदार्थ विरोधी २२ कारवाया केल्या. त्यात १८ लाख ८९ हजार ६२० रुपये किमतीचा ४.१९७ किग्रॅ. वजनाचा चरस, ८ लाख ६६ हजार ८४२ हजार रुपये किमतीचा ३४.६५२ कि.ग्र. गांजा जप्त करण्यात आला.

२०२४ साली गुन्हे उघडकीस आणण्याचे प्रमाण ९९ टक्के आहे. मागील वर्षी हे प्रमाण ८६ टक्के होते. गुन्हे उघड करण्याचे प्रमाण वाढले असले तरी गुन्हे शाबित करण्याचे प्रमाण मात्र घटले आहे. २०२३ मध्ये गुन्हे शाबित करण्याचे प्रमाण ६४ टक्के होते. २०२४ मध्ये हे प्रमाण ५६ टक्क्यांवर घसरले आहे.

# माणगाव येथील बायपासचे काम बंद
## कंत्राटदार पळाल्याने मुंबई-गोवा महामार्ग रखडला

**माणगाव : बातमीदार**

रायगड जिल्ह्यातील बहुचर्चित आणि बहुप्रतिक्षित मुंबई-गोवा महामार्गाचे काम अद्यापही रखडलेल्या अवस्थेत आहे.ठिकाठिकाणी बायपास, उड्डाणपूल, पुल, मोरी यांची कामे रखडली आहेत. तर काही ठिकाणी रस्त्याची बांधकामे मुंगीच्या पावलांनी सुरू आहेत. काही ठेकेदार काम बंद ठेवून पळून गेले आहेत तर काही ठिकाणी वन विभागाने महामार्गाला हरकती घेतल्या आहेत. जमिनीचे हस्तांतरण, भावकी, गावकी, वादंगामुळे न्यायालयात खटले दाखल करण्यात आले आहेत. त्यामुळे हा महामार्ग पुर्ण होण्यासाठी वाट पाहण्याशिवाय दुसरा मार्ग उरलेला नाही अशा संतप्त प्रतिक्रिया उमटत आहेत.



उत्तर रायगड जिल्ह्यातील महामार्गाचे काम विविध आंदोलने आणि जनतेच्या रेट्यामुळे कसेबसे घाई गडबडीत तात्पुरते झाले आहे. मात्र नागोठणे, रातवड, इंदापूर, माणगाव, काळ नदी, गोद नदी आणि लोणेरे येथील पुलांची बांधकामे दोन वर्षांपासून रखडलेल्या अवस्थेत आहेत. सुमारे २५ अरुंद मोर्यांची बांधकामे सुरूच झालेली नाहीत. दरम्यान वेळेत काम पूर्ण न केल्याने ठेकेदारावर कायदेशीर कारवाई करण्यात आली. त्यांच्यावर मनुष्य वधाचे गून्हे दाखल करुन अटक करण्यात आली. या कारवाईमुळे काही ठेकेदार काम बंद ठेवून पळून गेले. त्यामुळे पुन्हा या कामांची निविदा काढण्यात येणार आहे असे खासदार सुनील तटकरे आणि आमदार भरत गोगावले यांनी सांगितले.

सुरवातीला या महामार्गाचे डांबरीकरण सुरू करण्यात आले होते. मात्र अति पाऊस पडत असल्याने या महामार्गावर खड्ड्यातून मार्ग शोधुन प्रवास करावा लागत होता. त्यामुळे डांबरीकरण रद्द करुन कॉंक्रीटीकरण करण्यासाठी खासदार सुनील तटकरे यांनी मंजुरी आणली. दरम्यान याचेही घाईघाईने कामं केल्याने हा मार्ग काही ठिकाणी निकृष्ट दर्जाचा झाला. त्यामुळे रस्त्याची दैन्यावस्था झाली. याबाबत खासदार सुनील तटकरे आणि आमदार भरत गोगावले यांनी प्राध्यान्याने प्रयत्न सुरू केले आहेत. त्यांना कधी यश येईल ते त्यांनाही सांगता येत नाही.

हा मार्ग पुर्ण होत नसल्याने रोजगार, व्यवसाय, पर्यटन, शेती, उद्योग, व्यापार, शिक्षण यावर दुरगामी परिणाम होऊन कोकण पर्यायाने रायगड जिल्हा ५० वर्ष मागास राहीला आहे. येथील बहुतांशी तरुण रोजगाराच्या निमित्ताने मुंबई, गोवा, पूणे आणि अन्य राज्यांत नोकरीसाठी पलायन करत आहे. याचे कोणालाही सोयरे सुतक नाही असे खेदाने म्हणावे लागते. माणगाव येथे झालेल्या आढावा बैठकीत खासदार सुनील तटकरे यांनी हा महामार्ग एक वर्षात पूर्ण होईल असे सांगितले आहे.

**'कोरे' प्रशासनाचा असहकार**

माणगाव येथील बहुप्रतिक्षित बायपास महामार्गाचे काम दोन वर्षांपासून रखडलेल्या अवस्थेत आहे. कोकण रेल्वे आणि महामार्ग कार्यालय यांच्यामधील वादाने काम थांबले आहे. तेथे कोकण रेल्वेचे दुपदरीकरणाचे काम सुरू आहे. रेल्वेच्या मार्गावरुन गर्डर टाकताना रेल्वेचा मेगा ब्लॉक घेण्याची विनंती धुडकावून लावली होती. तेव्हापासून बायपासचे काम बंद आहे. हा प्रश्न सोडविण्यासाठी कोणीही प्रयत्नशील नाही. याकडे लक्ष दिले जात नाही असा आरोप केला जात आहे.

**माणगाव बायपासच्या कामाच्या आधीच्या ठेकेदाराने मी काम करण्यास असाह्य आहे, असे सांगितले आहे. त्यामुळे बायपासच्या कामाची नवीन निविदा काढण्यात आली आहे. फेब्रुवारी महिन्याच्या आसपास बायपासचे काम सुरू करण्यात येईल.**

**-पंकज गोसावी,**
**महामार्ग उपअभियंता**

# वाहनधारकांनी वाहनांना हाय सेक्युरिटी नंबरप्लेट बसविणे अत्यावश्यक

**रायगड : रामप्रहर वृत्त**

केंद्रीय मोटार वाहन नियम, १९८९ च्या नियम ५० नुसार वाहनांस हाय सिक्युरिटी नंबर प्लेट बसविण्यची तरतूद आहे. तसेच रस्ते व महामार्ग मंत्रालयाच्या परिपत्रक ११६२(एचएसआरपी) प्रमाणे दि.१ एप्रिल२०१९ पासून उत्पादित होणाऱ्या सर्व नवीन वाहनांना हाय सिक्युरिटी रजिस्ट्रेशन नंबर प्लेट बसविण्याची तरतूद करण्यात आली आहे.

त्यानुसार पूर्वी नोंदणी झालेल्या सर्व वाहनांना एचएसआरपी व तिस-या नोंदणी चिन्हांचे स्टिकर लावणे याकरीता https://transport.maharashtra.gov.in/1035/Home या वेबसाईटवर सर्व वाहनधारकांनी दि.३१ मार्च २०२५ पूर्वी नोंदणी करावी, असे आवाहन उप प्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालयाकडून करण्यात आले आहे.प्रत्येक कार्यालयामध्ये आवश्यक असणाऱ्या किमान एचएसआरपी बवसविणाऱ्या केंद्राना मान्यता देण्यात आली आहे. जुन्या वाहनांना एचएसआरपी बसविण्यासाठी परिवहन विभागाने तयार केलेल्या एचएसआरपी पोर्टलवर दि.३१ मार्च २०२५ पर्यंत नोंदणी करणे बंधनकारक करण्यात आले आहे. दि. १ एप्रिल२०१९ पूर्वी नोंदणीकृत मोटार वाहनांसाठी वर नमूद केलेल्या अधिकृत एचएसआरपी उत्पादकांकडून वाहनांवर बसविण्यात आलेले एचएसआरपी हेच केवळ वैध मानले जातील

# खालापूर तहसीलचे जमीन महसूल कर वसुलीसाठी प्रयत्न

**चौक : प्रतिनिधी**

खालापूर तहसील कार्यालयाने जमीन महसूल कर (धारा) वसुली साठी प्रयत्न सूरू केले आहेत. महसूल विभाग ३१ जुलैपर्यंत धारा वसुली करते,पण आर्थिक वर्ष हे ३१ मार्च असल्याने वसुली मोहीम जोरदार पणे राबविली जात आहे .

जमिनीचा आकार पाच रुपयापेक्षा जास्त आहे, अशा जमीनदार यांच्याकडूनही वसुली केली जाते,तर पाच रुपये पेक्षा कमी आहेत, त्यांना जमीन महसूल (धारा) सरकारने माफ केला आहे.

# पेण पोलिसांच्या नाकाबंदीतून लाखोंचा दंड वसूल

**पेण : प्रतिनिधी**

पेण पोलीस ठाण्याच्या हद्दीत ३१ डिसेबर व नववर्ष स्वागताच्या अनुषंगाने नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने तीन दिवसांपासून नाकाबंदी तसेच इतर कार्यवाही करत पोलिसांनी तब्बल ३ लाख ४० हजार रुपयांचा दंड वसूल केला आहे.

पेण पोलीस ठाण्याचे निरीक्षक संदीप बागुल यांच्या मार्गदर्शनाखाली पेण शहरातील बोरगाव, खोपोली बायपास रोड, नगरपालिका नाका, जुना पेट्रोल पंप अशा चार महत्वाच्या ठिकाणी पोलिसांकडून नाकाबंदी करण्यात आली होती. या दरम्यान एकूण ४२२ वाहतूक तसेच इतर दारूच्या केसेस करण्यात आल्या यात सुमारे ३ लाख ४० हजार रुपयांचा दंड वसुल करण्यात आला.




**पनवेल महानगरपालिका, पनवेल**
ता. पनवेल, जि. रायगड

जा.क्र. : पमपा/जनसंपर्क/३१२४/प्र.क्र.६३१/६३२/२०२४ — दिनांक : ०३/०१/२०२५

| अनु. क्र. | कामाचे नाव | निविदा क्र. | दिलेल्या कामाची अंदाजपत्रकीय रक्कम रु. | इसारा रक्कम रुपये | कामाचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| १. | Design, Supply, Installation, Testing & Commissioning of DPPCLWMS at Gardens Under Kamothe | PMC/ Garden/14 2024-2025 | रु. ९५२२८३९/- (GST विरहित) | ९५२२८/- | १२ महिने |

या कामाच्या निविदेबाबतची माहिती शासनाच्या https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दिनांक ६/०१/२०२५ रोजी प्रसिद्ध करण्यात येणार आहे. संबंधित निविदाधारकांनी याची नोंद घ्यावी.

**सही/-**
**(डॉ. प्रशांत रसाळ)**
**अतिरिक्त आयुक्त-।**
**पनवेल महानगरपालिका, पनवेल**



**सावधान नोटीस**

**दावा मिळकतीचे वर्णन**
**गाव-खानावळे, तालुका- पनवेल, जि. रायगड**

| गाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पैसे. |
|---|---|---|---|---|
| खानावळे | १ | १/ब | ०-२७-८० | ५.५८ |
| खानावळे | १३ | २/१ | १-४६-०० | १५.५० |
| खानावळे | १४ | - | ०-३४-९० | ५.५६ |
| खानावळे | १६ | १ | ०-४०-५० | ७.५८ |
| खानावळे | १६ | ३ | ०-४३-५० | ६.२८ |

तमाम जनतेस या नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिल मे. सॅफरॉन पार्क प्रोजेक्ट प्रा. लि. शेलटन सफायर, ४०६, ४०७ चौथा मजला सेक्टर १५, प्लॉट नं. १८/१९, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४००६१४ नोंदणीकृत खाजगी आस्थापना तर्फे संचालक श्री. नरेंद्र मणीलाल बुटाला व श्री. प्रत्यक्ष नरेंद्र बुटाला यांनी पनवेल येथील मे. दिवाणी न्यायाधीस वरिष्ठ स्तर साहेब यांचा कोर्टात स्पेशल दिवाणी मुकादमा दावा क्र.५८ / २०२३ हा प्रतिवादी श्री. महादेव रामचंद्र पाटील राहणार खानावळे यांचे विरुध्द दिनांक ०३/०९/२०१२ रोजीच्या साठेकराराची विशेष पूर्तता करुन मिळण्याकरीता व निरंतर ताकदीकरीता ठरावा करिता नुकसान भरपाई करीता तद्नुषगिक मागण्या करीता वर नमूद भूखंडाबाबत ज्यास दिवाणी दाव्यामध्ये दावा भूखंड असे संबोधिले आहे. सदर दिवाणी दावा आज रोजी न्याय प्रविष्ठ आहे. सदर दाव्याच्या दावा मिळकतीचे वर्णन केलेल्या भूखंडाचे लीज पेंडन्सी हे सह. दुय्यम निबंधक पनवेल यांच्या कार्यालयात दस्त क्र. पवल-४ -१२३५३-२०१९ अन्वये दिनांक २३/१२/२०१९ रोजी नोंदणीकृत केलेले आहे.

सदर नोटीसद्वारे तमाम जनतेस असे सुचित करण्यात येते की, वर्णन केलेल्या दावा मिळकतबाबतचे कोणतेही व्यवहार हे माझ्या अशिलांच्या हक्कास व अधिकारास बाधा निर्माण करणे आणि त्यामुळे सदर मिळकती बाबतचे व्यवहार हे माननीय दिवाणी न्यायालय हे सदर दिवाणी दाव्यात जो हूकूमनामा पारित करतील त्याला अधीन राहून असतील म्हणून सदर दावा मिळकीबाबत कोणत्याही व्यवहार हा स्पेशल दिवाणी मुकादमा क्र. ५८/२०२३ च्या अधीन राहून असेल व सदर व्यवहाराची जोखीम हि संपूर्णतः दावा मिळकत खरेदी करण्याचा व्यक्तीची अथवा संस्थेची असेल आणि भविष्यात त्या व्यक्ती अथवा संस्थेस सदर दिवाणी दाव्यात पक्षकार केले जाईल आणि त्यातून होणाऱ्या संभाव्य परिणामास ती व्यक्ती अथवा संस्था स्वतः जबाबदार राहील याची नोंद घ्यावी.

आज दिनांक ०४/०१/२०२५ रोजी.

**सही/-**
**ॲड. अदिती बाळकृष्णा पाटील**
**वकील उच्च न्यायालय**

यशोकिरण सोसायटी, गाळा नं. १०, लोखंडी पाडा, पनवेल,
विर सावरकर चौकाजवळ, ता.पनवेल, जि. रायगड मो.नं. ८९८३१५८१४१

# बेकायदा बांधकामावर हातोडा

## अतिक्रमणविरोधी विभागामार्फत नेरूळ विभागात कारवाई

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महापालिकेच्या अतिक्रमण विभागाच्या वतीने नोटीस देऊनही संबंधितांनी नोटिशीची दखल न घेतल्यामुळे अनधिकृत बांधकामांविरोधात आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या निर्देशानुसार व अतिरिक्त आयुक्त डॉ. राहुल गेठे यांच्या मार्गदर्शनाखाली अतिक्रमण विभागाने नेरूळ विभागात पाडकामाची कारवाई करण्यात आली.



नवी मुंबई महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील नेरुळ विभागाअंतर्गत एन.एल.-१ बी-१६/१५, से.१०, नेरूळ, एन.एल.१ ए-६/४, से.१०, नेरूळ, यांचे सदर ठिकाणी प्रत्यक्ष पहाणी केली असता अंदाजे ३.५०मी द ७.२०मी मोजमापाचे G+४ आर. सी. सी. बांधकाम अनधिकृतरित्या करीत असल्याचे निदर्शनास आल्याने सदर अनधिकृत बांधकामधारकाला अनधिकृत बांधकाम केल्याप्रकरणी नेरूळ विभाग कार्यालयाकडून नोटीस बजावण्यात आलेली होती. तथापि, नोटीसीची मुदत संपुष्टात येऊनही अनधिकृत बांधकाम स्वत:हून हटविण्यात आले नाही.

कारवाई सहा.आयुक्त तथा विभाग अधिकारी जयंत जावडेकर व अतिक्रमण विभागातील कर्मचारी, १० मजूर, दोन गॅस कटर, सहा ब्रेकरच्या सहाय्याने अतिक्रमण विभागाकडील पोलीस पथक समवेत सुरक्षारक्षक यांच्या मार्फत करण्यात आली आहे. यापुढे देखील अशाप्रकारे अतिक्रमण विरोधी कारवाई तीव्र करण्यात येणार आहे.

## कामगारांना ब्लँकेटचे वाटप

**पनवेल : वार्ताहर**

खारघर परिसरात थंडीचे प्रमाण वाढत असून, पदपथावर राहणाऱ्या गरजूंवर थंडीचा परिणाम होत आहे. पदपथावर राहणाऱ्या कामगारांचा थंडीपासून बचाव व्हावा, या उद्देशाने 'वन हेल्प फाउंडेशन' तर्फे पदपथावर राहणाऱ्या कामगारांना ब्लँकेट वाटप करण्यात आले.

गेल्या काही दिवसांपासून थंडीचा कडाका वाढल्याने लोक शेकोटीचा आधार घेत आहेत. खारघर परिसरात मोठ्या प्रमाणात बांधकामे तसेच विकास कामे सुरू आहेत. पोटाची खळगी भरण्यासाठी विविध राज्यातील कामगार अनेक ठिकाणी काम करीत आहेत. दिवसा नाक्यावर मिळेल ते काम करुन रात्री रस्त्यालगतच्या पदपथ तसेच मेट्रो रेल्वे पुलाखाली दुभाजकात झोपणाऱ्या कामगारांच्या चेहऱ्यावर आनंद निर्माण व्हावा तसेच थंडीपासून त्यांचे संरक्षण व्हावे, या उद्देशाने 'वन हेल्प फाउंडेशन'चे अध्यक्ष लक्ष्मण व्हनखंडे, सचिव शरद गुंजाळ तसेच सदस्य संकेत दहितुले, अमोघ ठोंबरे, यश माणिक, प्रभाकर पिंगळे, सचिन वाझे, माधव राजुरे, राजू मिश्रा, रतिलाल पाटील, सचिन मोटे आदींनी सामाजिक भान ठेवून खारघर परिसरात फुटपाथवर झोपणाऱ्या शंभरापेक्षा अधिक कामगारांना ब्लँकेट वाटप केले.

# ज्येष्ठ नागरिक ही देशाची शक्ती -देवेंद्र भुजबळ

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

दिडशे कोटी लोकसंख्या असलेल्या आपल्या देशात १० टक्के म्हणजे जवळपास १५ कोटी नागरिक हे ज्येष्ठ नागरिक आहेत. अशा या नागरिकांना समाजाने, कुटुंबीयांनी अडचण न समजता शक्ती समजून त्यांचा त्यांच्या क्षेत्रातील त्यांच्या अनुभवांचा, विचारांचा तरुण पिढीला आणि पर्यायाने देशाला कसा फायदा होईल, याचा विचार केला पाहिजे, असे प्रतिपादन निवृत माहिती संचालक देवेंद्र भुजबळ यांनी केले.

ते अखिल भारतीय वरिष्ठ नागरिक संघाच्या २४ व्या वर्धापन दिनानिमित्त नेरूळ येथे आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.या वेळी बोलताना भुजबळ पुढे म्हणाले की, बदलत्या सामाजिक,आर्थिक, कौटुंबिक, भावनिक कारणांमुळे देशातील वृद्धाश्रमांची संख्या वाढतच चालली आहे, हे कोणे एकेकाळी संयुक्त कुटुंब पद्धती असलेल्या आपल्या देशाला भूषणावह नाही. नको त्या बाबतीत आपण पाश्चात्यांचे अंधानुकरण न करता आपला इतिहास, परंपरा, कुटुंब पद्धती, नाते संबंध यांचे महत्व आणि त्यांची प्रत्यक्ष जीवनातील उपयोगिता ओळखल्यास आज समाजात वाढत चाललेले घटस्फोट, मानसिक-शारीरिक अनारोग्य, ताण तणाव, बदलत्या कुटुंब व्यवस्थेमुळे केवळ वृद्धांचीच नव्हे तर बालकांची होणारी हेळसांड अशा कितीतरी गोष्टींना निश्चितच आळा बसू शकेल, असे भुजबळ यांनी सांगितले.

या वेळी महाराष्ट्र राज्य ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष अण्णासाहेब टेकाळे, नेरूळ जेष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष डी एन चापके आदींची या वेळी मार्गदर्शनपर भाषण झाली.



# अनधिकृत बांधकामे, होर्डिंग्ज, बॅनरवर राहणार वॉच

**नवी मुंबई : बातमीदार**

अनधिकृत बांधकामे व अतिक्रमणाबाबत जनहित याचिका आणि अनधिकृत होर्डींग, बॅनर व पोस्टर्सबाबत जनहित याचिका अन्वये मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार अनधिकृत बांधकाम / अतिक्रमणांवर नोटीस देऊन निष्कासनाची कारवाई करणे, निष्कासनाचा खर्च वसूल करणे, फौजदारी गुन्हे दाखल करणे, तसेच अनुषंगिक कारवाई करण्यात येणार आहे.

सार्वजनिक रस्ते, पदपथ तसेच वाहतुकीला अडथळा ठरणारे अनधिकृत होर्डींग, बॅनर्स / पोस्टर्स हे विशेष मोहीम घेऊन हटविण्याचे आदेशित केले आहे. नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रात जाहिरात फलक, होर्डींग, बॅनर लावण्यासाठी महानगरपालिकेने जागा निश्चित केल्या असून त्याच जागांवर, विहित आकारमानात जाहिरात फलक, होर्डींग, बॅनर प्रदर्शित करण्यासाठी विहीत नमुन्यात विभाग कार्यालयात अर्ज सादर करणे आवश्यक आहे.महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये अनधिकृत इमारती / अतिक्रमणे, विनापरवानगी जाहिराती / होर्डिंग्ज / बॅनर्स / पोस्टर्स आढळल्यास त्याची माहिती नागरिकांनी महानगरपालिकेस देण्यासाठी विभागनिहाय दूरध्वनी क्रमांक उपलब्ध करुन देण्यात येत आहेत. तसेच यावर कारवाई करण्यासाठी संबंधित विभाग कार्यालयाचे सहा. आयुक्त तथा विभाग अधिकारी यांची प्राधिकृत अधिकारी म्हणून विभागनिहाय नियुक्ती करण्यात येत आहे.

नागरिक याविषयीच्या तक्रार या संकेतस्थळावरील ग्रिव्हेन्स पोर्टलवर किंवा माझी नवी मुंबई या मोबाईल पवर अथवा ८४२२९५५९१२ या व्हॉट्सअ‍ॅप मोबाईल क्रमांकावर दाखल करू शकतात.

# विवेकानंद विद्यासंकुलात लोककलेचा आविष्कार

**नवी मुंबई : बातमीदार**

छत्रपती शिक्षण मंडळ कल्याण संचलित माध्यमिक विद्यालय विवेकानंद संकुल, सानपाडा आयोजित संगम लोककलेचा सांस्कृतिक कार्यक्रम विष्णुदास भावे नाट्यगृह याठिकाणी संपन्न झाला.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान विश्वास सोनवणे, प्रमुख अतिथी दीपक पळसुले व वृत्त निवेदक त्याचप्रमाणे संस्कार वाहिनीचे सुनील खन्ना हे उपस्थित होते. कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी वर्ष भरात विविध स्पर्धा व सहशालेय उपक्रमात मिळविलेल्या पारितोषिकांचे वितरण पाहुण्याच्या हस्ते झाले त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांनी विविध गुणदर्षण कार्यक्रमाचे सादरीकरण केले.

लोप पावत चाललेल्या भारतीय लोककलेचा जागर करण्याचे काम विद्यार्थ्यांनी नृत्यांच्या माध्यमातून केले. भारतातील विविध प्रांतातील लोककलेचा आविष्कार



तसेच भारतीय संस्कृती व संस्कार या कार्यक्रमातून घडवून आणण्यात आला. नृत्याच्या माध्यमातून राष्ट्रीय एकात्मता घडवण्याचा अभिनव प्रयत्न विद्यार्थ्यांनी केला. त्याचप्रमाणे शाळेच्या वाचनालयामार्फत शिक्षक, पालक, व विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करण्यासाठी अधिक पुस्तके वाचणाऱ्या विद्यार्थी, शिक्षक व पालक यांना शाळेमार्फत वाचनसम्राज्ञी आणि वाचन सम्राट हे पुरस्कार देण्यात आले.

# फसवणूक प्रकरणातील आरोपीला मंगळवारपर्यंत पोलीस कोठडी

**पनवेल : वार्ताहर**

पनवेलमधील नामांकित बांधकाम व्यावसायिक तुकाराम दुधे यांना केलेल्या ५५ लाख २९ हजार रुपयांच्या फसवणूकप्रकरणी पनवेल शहर पोलिसांनी अकोला बाळापूर येथे जावून आरोपीच्या मुसक्या आवळल्या होत्या. आरोपीला पनवेल न्यायालयात हजर केले असता ७ तारखेपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे.

फजल रहेमान गुलाब नबीब अन्सारी याने त्याच्या मेसर्स साई अँश पाँड् ट्रान्सपोर्टिंग कंपनीला महाजनको पारस या औष्णिक ऊर्जा प्रकल्पामध्ये टेंडर मिळाले असून टेंडरच्या अनुषंगाने कंपनीने एकूण एक कोटी ८५ लाख ३९ हजार २०७ इतकी रक्कम भरलेली आहे असे तुकाराम दुधे यांना सांगितले. आणि तेवढ्या रकमेच्या महाजनकोच्या पावत्या दाखवून तुकाराम दुधे यांच्याकडून कंपनीमध्ये ३० टक्के भागीदार म्हणून ५५ लाख २९ हजार रुपये मे. साई अँश पाँड् ट्रान्सपोर्टिंग कंपनीच्या बँक खात्यावर स्वीकारली.

त्यानंतर आरोपीने डिसेंबर २०२३ ते जानेवारी २०२४ या कालावधीमध्ये महाजनको मधून ४१९ रुपये दराने राखाडी विकत घेऊन ती पुढे ५४० रुपये या दराने विक्री करून एकूण ९ हजार २४६ मॅट्रिक टन राखाडी विकली आणि दुधे यांनी गुंतवलेल्या रकमेवरती कमाई करून आणि तसे करण्यासाठी महाजनको कंपनीचे इंजिनियर यांनी खोट्या पावत्या, इतर कागदपत्रे बनवून देऊन त्याद्वारे दुधे यांचा विश्वास संपादन केला आणि गुंतवलेली रक्कम ५५ लाख २९ हजार रुपये आणि त्या बदल्यात कोणत्याही मोबदला न देता तुकाराम दुधे (रा. भारत गॅसजवळ, पनवेल) यांची फसवणूक केली.

याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात दाखल होताच वपोनि नितीन ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक सुनील वाघ, पो.हवा.अतुल देवकर व पो.शि.दत्ता जाधव आदींच्या पथकाने तांत्रिक तपासाच्या आधारे शोध घेतला असता सदर आरोपी हा अकोला बाळापूर येथे असल्याचे समजून आल्याने त्या ठिकाणी जावून सापळा रचून या आरोपीला ताब्यात घेवून पनवेल कोर्टात हजर करण्यात आले असता ७ तारखेपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे.

# ज्येष्ठ नागरिक संघाचा वर्धापन दिन उत्साहात

**नवी मुंबई : बातमीदार**

नवीन वर्षाच्या पूर्व संध्येला नवी मुंबईतील पहिले स्मार्ट व्हिलेज असलेल्या दिवाळे कोळीवाड्यातील जेष्ठ नागरिक संस्थेच्या विरंगुळा केंद्राचा प्रथम वर्धापन दिन मंगळवार ( ता. १ ) रोजी मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आला. या वेळी, प्रतिमा पूजन करून भजन, हरिपाठ व तिर्थ प्रसादाची व्यवस्था करण्यात आली होती. तसेच ज्येष्ठ नागरिक संघातर्फे विविध क्षेत्रात कार्याचा ठसा उमटवलेल्या नागरिकांचा गौरव आणि मान्यवरांचा सत्कार करण्यात आला.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे संपूर्ण देशातील गावांचे स्मार्ट व्हिलेजचे स्वप्न तसेच उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतील गाव दत्तक योजनेच्या अंतर्गत बेलापूर विधानसभा क्षेत्राच्या आमदार मंदा म्हात्रे यांनी गेल्यावर्षी नवीन वर्षाची सुरुवात नवी मुंबईतील पहिले स्मार्ट व्हिलेज असलेल्या दिवाळे गावात ज्येष्ठ नागरिकांकरिता विरंगुळा केंद्राची स्थापना करून तत्कालीन महापालिका आयुक्त राजेश नार्वेकर यांच्या हस्ते या विरंगुळा केंद्राचा शुभारंभ करण्यात आला होता. नववर्षाच्या पहिल्याच दिवशी विरंगुळा केंद्र मिळाल्याने ज्येष्ठांच्या चेहऱ्यावर आनंद फुलला होता. या संस्थेला १ वर्ष पूर्ण झाले असून वर्षभरात या जेष्ठ नागरिक संस्थेच्या माध्यमातून आरोग्य शिबीर, रक्तदान शिबीर, तसेच नेत्र तपासणी शिबीर यासह दैनंदिन हरिपाठ असे, अनेक उपक्रम राबवले आले आहेत. या संस्थेत १४०हून अधिक सभासद असून, प्रत्येक सामाजिक कार्यात मोठ्या उत्साहाने सहभागी असतात. समाजातील ज्येष्ठ व्यक्तींनी जीवनात आनंदी राहण्यासाठी आपल्या जीवनशैलीत बदल करून त्यास अध्यात्माची जोड देत मुख्यमंत्री 'तीर्थदर्शन' योजने अंतर्गत निवड झालेल्या नवी मुंबई महानगरपालिका हद्दीतील १२१ लाभार्थी जेष्ठ नागरिकांनी अयोध्या तीर्थयात्रेचा लाभ घेतला. तर सफला एकादशी निमित्त पंढरपूर तीर्थयात्रेत ५७ सदस्य सहभागी झाले होते.

दरम्यान, स्मार्ट व्हिलेज गाव दत्तक योजने अंतर्गत विरंगुळा केंद्राच्या परिसरात ज्येष्ठ नागरिकांच्या आरोग्यासाठी ओपन जिम सुरू केली आहे. या माध्यमातून ज्येष्ठांना सकाळी व्यायाम करता यावा, त्यांचे आरोग्य हे निरोगी ठेवता यावे या दृष्टिकोनातून सर्व सुविधायुक्त म्हणून विरंगुळा केंद्राची निर्मिती करून देण्यात आली असून, मतदारसंघातील ज्येष्ठ नागरिकांसाठी शासनाच्या योजनांचा कसा फायदा होईल याकडे लक्ष देऊन जास्तीत जास्त सुविधा उपलब्ध करून देणार असल्याचे बेलापूर विधानसभा आमदार मंदाताई म्हात्रे यांनी सांगितले.

या वर्धापन दिन सोहळ्याप्रसंगी नवी मुंबई महापालिका समाज विकास विभागाचे उपायुक्त किसनराव पालांडे, समाज विकास अधिकारी बाबासाहेब भोसले, स्थानिक मा. नगरसेविका भारती कोळी, शंकर नाईक, डॉ. आशिष नाईक, नीलकंठ कोळी, प्रवीण मार्के, परशुराम पाटील, अनंता बोस, रमेश हिंडे, तुकाराम कोळी, जेष्ठ नागरिक संस्थेचे अध्यक्ष चंद्रकांत कोळी, श्री. ज्ञानराज प्रासादिक भजन मंडळ, श्री संत ज्ञानेश्वर भजन मंडळ, गजानन प्रासादिक भजन मंडळ या भजन मंडळानी सोहळ्याला खऱ्या अर्थी रंगत आणली.

# वीर वाजेकर महाविद्यालयात सायबर क्राईम जनजागृती

**उरण : वार्ताहर**

रयत शिक्षण संस्थेच्या वीर वाजेकर कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय महालन विभाग फुंडे ,तालुका उरण महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना व न्हावा-शेवा पोलीस ठाणे यांच्या संयुक्त विध्यमाने सायबर सिक्युरिटी या विषयावर गुरुवारी (दि. २) व्याख्यान झाले.

संपूर्ण देशभर वाढलेल्या सायबर क्राइम या विषयावर न्हावा-शेवा पोलिस ठाण्याचे वरीष्ठ पोलीस निरीक्षक बी.टी. ओवे यांनी मोबाईलच्या माध्यमातून सायबर गुन्हे कसे होतात,त्याविषयी अतिशय मोलाचे व महत्त्वपूर्ण मार्गदर्शन केले.मोबाईल वर ओ. टी. पी.ऐवजी ऑनलाईन लिंक द्वारे फसविले जाते,त्यापासून कसे सुरक्षित राहता येईल याबद्दल माहिती दिली. विद्यार्थ्यांनी पोलीस काकांच्या संपर्कात राहिले पाहिजे. वाहने चालवित असताना,हेल्मेट सक्तीचे असले पाहिजे.वाहन चालक परवाना,जीवन विमा अपघात विमा असणे गरजेचे आहे.

प्राचार्य,डॉ.आमोद ठक्कर यांनी अध्यक्षीय मनोगतातून महाविद्यालय विद्यार्थ्यांच्या हिताचे उपक्रम घेत असतो. आजचा महाविद्यालयीन विद्यार्थी मोबाईलच्या आहारी गेला आहे.सायबर गुन्हेगारी आज सर्वत्र फोफावली असल्याने त्यातून आजच्या तरुण पिढीला जागृत करणे आवश्यक आहे.

या वेळी न्हावा शेवा पोलीस स्टेशनच्या महिला पोलिस हवालदार कनिक्षा नाईक ह्यांनी विद्यार्थ्यांना यू ट्यूब व हेल्प लाईन क्रमांक देऊन त्याचा वापर क्सा करता येईल ह्याची विस्तृत माहिती दिली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.राम गोसावी, सूत्रसंचालन प्रा.योगेश कुलकर्णी यांनी केले. उपप्राचार्यप्रा. दिलीप केंगार यांनी आभार मानले.

## क्लिक...क्लिक...!



**मुरूड : शासनाच्या कृषी विभागाने गारंबी धरणातून वाहत्या पाण्यावर जागोजागी बंधारे बांधले. त्यात पाणीही साचले आहे, पण गाळामुळे फक्त एक फूट पाणी आहे. सर्व बंधाऱ्यातील गाळ उपसण्याची गरज आहे.** ( छाया : सुधीर नाझरे)

# सखोल स्वच्छता मोहिमेत रस्त्यांची स्वच्छता

**नवी मुंबई : बातमीदार**

शहरातील प्रदुषणाला आळा बसावा व हवा गुणवत्ता चांगली राहावी यादृष्टीने सखोल स्वच्छता मोहीमांचा पंधरवडा महापालिका आयुक्त डॉ कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनानुसार १३ जानेवारीपर्यंत राबविण्यात येत असून ३० डिसेंबरपासून या मोहीमांना प्रभावी रितीने सुरुवात करण्यात आलेली आहे.

अतिरिक्त आयुक्त सुनिल पवार यांच्या नियंत्रणखाली घनकचरा व्यवस्थापन विभागाचे परिमंडळ १ उपायुक्त डॉ. अजय गडदे व परिमंडळ २ उपायुक्त संतोष वारुळे तसेच परिमंडळ १ चे उपायुक्त सोमनाथ पोटरे व परिमंडळ २ चे उपआयुक्त डॉ कैलास गायकवाड यांच्या माध्यमातून लोकसहभागावर भर देत घेत नमुंमपा अधिकारी, कर्मचारी व स्वच्छताकर्मी यांच्या सोबतीने या सखोल स्वच्छता मोहीमा राबविण्यात येत आहेत.



यामध्ये ब्रशझाडू, फ्लीपर मशीन यांच्या सहाय्याने रस्ते, पदपथ, दुभाजक या ठिकाणी साचलेली धूळ, माती यांची सखोल सफाई करण्यात येत असून त्यानंतर फॉगर्स मशीनव्दारे मलप्रक्रिया केंद्रातून शुध्द झालेले प्रक्रियाकृत पाणी वापरुन स्वच्छता करण्यात येत आहे. यामुळे रस्ते स्वच्छतेप्रमाणेच हवेतील धूळीचे प्रमाण कमी होउुन हवा गुणवत्तेत लक्षणीय सुधारणा होत आहे. नागरिकांकडून या डीप क्लीनिंग मोहीमेचे मोठया प्रमाणावर स्वागत करण्यात आले आहे.

या अनुषंगाने ३१ डिसेंबर रोजी बेलापूर विभागात पारसिक हिल या ठिकाणी सखोल स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. बेलापूर विभागाचे सहा.आयुक्त डॉ.अमोल पालवे व स्वच्छता अधिकारी नरेश अंधेर यांनी स्वच्छता निरीक्षक, उप स्वच्छता निरीक्षक व स्वच्छताकर्मी यांच्या सहयोगातून सखोल स्वच्छता केली. विशेष म्हणजे या मोहीमेत एसआयइएस महाविद्यालयाच्या एनएसएस विद्यार्थ्यांनी सक्रीय सहभाग घेतला.

नेरुळ विभागात सहाय्यक आयुक्त जयंत जावडेकर व स्वच्छता अधिकारी अरुण पाटील यांच्या नियंत्रणाखाली प्रशांत कॉर्नर ते राजीव गांधी उड्डाणपूल ते वझीराणी स्पोर्टस क्लब पर्यंत रस्ते सफाई करण्यात आली. तुर्भे विभागात सहा. आयुक्त प्रबोधन मवाडे व स्वच्छता अधिकारी जयेश पाटील यांच्या नियंत्रणाखाली कोपरी तलाव परिसरात सखोल स्वच्छता करण्यात आली.वाशी विभागात सहा.आयुक्त सागर मोरे व स्वच्छता अधिकारी जयश्री आढळ यांच्या नियंत्रणाखाली वाशीगाव आणि से.१७ परिसरात डीप क्लीनिंग मोहीम राबविण्यात आली. कोपरखैरणे विभागात सहा. आयुक्त सुनिल काठोळे व स्वच्छता अधिकारी राजूसिंग चव्हाण यांच्या नियंत्रणाखाली कोपरखैरणे रेल्वे स्टेशन परिसर सफाई करण्यात आली.

घणसोली विभागात सहा. आयुक्त संजय तायडे व स्वच्छता अधिकारी विजय पडघन यांच्या नियंत्रणाखाली घणसोली सेक्टर ३, सेंट्रल पार्क परिसरात सखोल स्वच्छता मोहीम राबविली.ऐरोली विभागात सहा.आयुक्त डॉ. अंकुश जाधव व स्वच्छता अधिकारी राजेंद्र इंगळे यांच्या नियंत्रणाखाली टी जंक्शन ते दिवा सर्कल पर्यंत सखोल सफाई करण्यात आली. दिघा विभागात सहा.आयुक्त भरत धांडे व स्वच्छता अधिकारी प्रवीण थोरात यांच्या नियंत्रणाखाली दिघा तलाव परिसरात साफसफाई मोहीम राबविण्यात आली.

अशा प्रकारे आठही विभाग कार्यालय क्षेत्रात मुख्य रस्ते, त्याबाजूचे पदपथ व त्यामधील दुभाजक यांच्या कडेला जमिनीशी घट्ट झालेली माती व धूळ यांची ब्रश झाडूने स्वच्छता मित्रांनी सखोल स्वच्छता केली व त्यानंतर फॉगींग मशीनाव्दारे प्रक्रियाकृत पाणी मारुन रस्ते व पदपथ स्वच्छ करण्यात आले. उदयाही सर्व विभागात सखोल स्वच्छता मोहीमेचे नियोजन करण्यात आले असून यामुळे वातावरणातील धूळीचे प्रमाण कमी होण्यास मदत होणार असून या मोहीमेचे नवी मुंबईकर नागरिकांकडून स्वागत करण्यात येत आहे.

## निवडक



### वीर भाई कोतवाल यांची पुण्यतिथी

**धाटाव :** नाभिक समाजरत्न हुतात्मा वीरभाई कोतवाल यांची कोलाड नाभिक तरुण संघाच्या वतीने २ जानेवारीला कोलाड आंबेवाडी ग्रामपंचायत येथे पुण्यतिथी साजरी करण्यात आली. यावेळी हुतात्मा वीर भाई कोतवाल यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून नाभिक समाजातील त्यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. या वेळी समाजाचे अध्यक्ष किरण खराडे , सरपंच सुरेश महाबळे, भाई पवार, संदेश खराडे, संजय सकपाळ, यशवंत मोहिते, उत्तम साळुंखे, चंदकांत हुजरे, एकनाथ मोहिते यासह नाभिक बांधव उपस्थित होते .

### शिवराज्याभिषेकाचा देखणा सोहळा



**मुरूड :** तालुक्यातील साळाव येथील जिंदल विद्या मंदिर येथे नुकतेच वार्षिक स्नेहसंमेलन, सत्कार आणि पारितोषिक वितरण समारंभ कार्यक्रम मोठ्या उत्साहात झाला. यंदाच्या कार्यक्रमाचे शीर्षक 'धरोहर' होते, ज्याअंतर्गत 'आपली संस्कृती, आपला वारसा' हा विषय प्रत्येक नृत्यातून सादर करण्यात आला. शिवराज्याभिषेक सोहळ्याचे भव्य आणि देखणे सादरीकरण या कार्यक्रमाचे प्रमुख आकर्षण ठरले. समारंभाचे प्रमुख पाहुणे म्हणून साळाव येथील जे.एस.डब्ल्यू. कंपनीचे प्रमुख पंकज मलिक आणि नीलू मलिक होते. प्राचार्य मुकेश ठाकूर, उपप्राचार्य मंगेश बमनोटे आदी उपस्थित होते.

### द दुधाचा उपक्रमाला प्रतिसाद



**पाली :** पालीसह पेण व जिल्ह्यातील विविध ठिकाणी मंगळवारी (ता.३१) नववर्षाच्या पूर्वसंध्येला दूध वाटप करून प्रबोधन करण्यात आले. त्यामुळे शेकडो लोक दारू ऐवजी दूध प्यायले. व्यसनमुक्तीचा सामाजिक संदेश घेऊन संकल्प व्यसनमुक्तीचा, महायज्ञ दुधाचा या कार्यक्रमाचे पालीत आयोजन करून तब्बल २०० लिटर दुधाचे मोफत वाटप केले. या वेळी दारू सोडा दूध प्या हा सामाजिक संदेश सर्वसामान्य नागरिकांना दिला. अनेक वृद्ध महिला व पुरुषांनी डोक्यावर हात ठेवून अंकुश आपटे यांना शुभेच्छा आणि आशीर्वाद दिला, तर पेण येथे अंनिसचा व्यसनाला बदनाम करू या हा उपक्रम पालिका इमारतीसमोर झाला.

### वीर भाई कोतवाल यांना अभिवादन

**नागोठणे :** नाभिक समाजाचे रायगडचे क्रांतीसुर्य वीर भाई विठ्ठल लक्ष्मण कोतवाल म्हणजेच हुतात्मा वीर भाई कोतवाल यांच्या पुण्यतिथी निमित्त गुरुवारी (दि.२) सकाळी समाजाचे मार्गदर्शक दिलीप टके यांच्या निवासस्थानी नागोठणे शहरातील नाभिक समाज बांधव एकटवले व तेथून सकाळी ५.३० वाजता मशाल ज्योत घेऊन प्रभात फेरीस प्रारंभ झाला. ज्योत पेटवून हुतात्मा वीर भाई कोतवाल व हुतात्मा हिराजी पाटील यांना अभिवादन करण्यात आले. नागोठणे ग्रामपंचायत कार्यालयात अभिवादन करण्यात आले.

# मत्स्य प्रशिक्षण व यंत्रसामग्रीचे वाटप

## वावोशीत महिला बचत गटांना सहकार्याचा हात

**पाली : प्रतिनिधी**

खालापूर तालुक्यातील भिमनगर, वावोशी गावात केंद्रीय मात्स्यिकी प्रौद्योगिक संशोधन केंद्राकडून १९ ते २१ डिसेंबर या कालावधी दरम्यान अनुसूचित जाती समुदायासाठी तीन दिवसीय विशेष प्रशिक्षण व प्रात्यक्षिक कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. मत्स्योत्पादन व प्रक्रिया तंत्रज्ञानाच्या माध्यमातून स्थानिक समुदायांना सक्षम करण्याच्या उद्देशाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमाचे आयोजन केंद्रीय मात्स्यिकी प्रौद्योगिक संशोधन विभाग कोचीचे संचालक डॉ. जॉर्ज निनन, डउड्झ चे नोडल ऑफिसर डॉ. ए. सुरेश, आणि नवी मुंबईच्या वैज्ञानिक प्रमुख डॉ. एल. नरसिंहा मूर्ती, डॉ. आशा के. के यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. कार्यक्रमाचे समन्वयक डॉ. अभय कुमार यांनी मत्स्योत्पादनाच्या तत्त्वांवर आणि मासे आरोग्य व्यवस्थापनावर मार्गदर्शन केले. यासोबतच डॉ. एल. नरसिंहा मूर्ती यांनी शेतकऱ्यांना मत्स्य विभागाच्या योजनांबद्दल आणि राष्ट्रीय मत्स्य विकास मंडळ याबद्दल माहिती दिली.

या प्रशिक्षणादरम्यान महीला व शेतकऱ्यांना मासे स्वच्छता, कटिंग, फिलेट तयार करणे, बर्फ साठवणूक, तसेच फिश बॉल्स, फिश फिंगर्स, बटरफ्लाय श्रिंप यांसारख्या मूल्यवर्धित उत्पादनांची तयारी शिकवण्यात आली. तसेच प्रादेशिक



आवडीनुसार उत्पादने विकसित करण्याचे प्रशिक्षणही देण्यात आले.

रायगड जिल्ह्यातील पंचशील महिला बचत गट, रमाई महिला बचत गट व संविधान महिला बचत गटातील ३० सदस्यांना या कार्यक्रमाचा लाभ मिळाला. या प्रशिक्षणादरम्यान शेतकरी व महिला बचत गटाला सरपंच आश्विनी शहासने, वैज्ञानिक डॉ. आशा के. के, अभय सर यांच्या हस्ते मासे प्रक्रिया यंत्रसामग्री वितरित करण्यात आली, यामध्ये बर्फ बॉक्स, कापण्याचे यंत्र, सीलिंग मशीन, प्रेशर कुकर, गॅस स्टोव्ह, वजन काटा, मिक्सर, आणि इतर उपयुक्त साधनांचा समावेश होता. यावेळी या कार्यक्रमाला केंद्रीय मात्स्यिकी प्रौद्योगिक संशोधन केंद्र नवी मुंबईच्या वैज्ञानिक प्रमुख डॉ. एल. नरसिंहा मूर्ती, डॉ. आशा के. के, डॉ अभयकुमार, प्रियांका नकवा, तुकाराम वाघमारे, सुप्रिया चौताळे, सूरज पाटील, आणि अनिकेत कांबळे यांसारखे अधिकारी उपस्थित होते.

**या उपक्रमामुळे अनुसूचित जाती समुदायाला नवनवीन तंत्रज्ञानाचा वापर करून अधिक सक्षम होण्याची संधी मिळाली आहे. मत्स्योत्पादन व प्रक्रिया तंत्रज्ञानाच्या माध्यमातून शेतकऱ्यांचे जीवनमान सुधारण्याच्या दिशेने ICARACIFT संशोधन केंद्राने महत्त्वाचे पाऊल उचलले आहे.**
**-डॉ. अभय कुमार, वैज्ञानिक, अनुसंधान केंद्र, नवी मुंबई**


**या कार्यक्रमामुळे महिला बचत गट व शेतकऱ्यांना लघु अन्न व्यवसाय सुरू करण्याची संधी मिळाली असून त्यांचे स्थानिक जीवनमान सुधारण्यासाठी महत्त्वाची भूमिका असून आर्थिक विकास गतीमान होण्यास खूप मोठी मदत होईल असा आम्हाला विश्वास आहे.**
**-आश्विनी मोरे. समुदाय संसाधन प्रमुख वावोशी विभाग**

# रायगडात १०० दिवसीय क्षयरोग मोहीम उत्साहात

**रायगड : रामप्रहर वृत्त**

देशाचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी सन २०२५ पर्यंत भारत देश क्षयरोग मुक्त करण्याचे ध्येय ठेवलेले आहे जे की शाश्वत विकास ध्येयाच्या अपेक्षित कालावधीपेक्षा ५ वर्ष अगोदर आहे. त्या अनुषंगाने रायगड जिल्हयात ७ डिसेंबर २०२४ पासून १०० दिवसीय क्षयरोग मोहिम राबविण्यात येत असून ३१ डिसेंबर रोजी डॉ.बाबासाहेब आंबेडकर रुग्णालयात एमजीएम वैद्यकीय महाविद्यालय, कामोठे, पनवेल येथील अधिष्ठाता डॉ.जी. एस. नरशेट्टी व डॉ. प्रसाद वाईंगणकर यांच्या मार्गदर्शनाखाली १०० दिवसीय क्षयरोग मोहिम राबविण्यात आली असल्याची माहिती जिल्हा क्षयरोग अधिकारी रायगड डॉ.सचिन जाधव यांनी दिली आहे.

या अंतर्गत जनजागृतीसाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकर हॉस्पिटल व खोपोली बस स्टॅण्ड येथे एमजीएम वैद्यकीय महाविद्यालय येथील डॉक्टर्स व नर्सिंगच्या विद्यार्थिनींनी क्षयरोगावर पथनाटय सादर केले. यास जनतेने चांगला प्रतिसाद दिला. जनवैद्यक विभागच्या डॉ.सुनिला



संजीव व विक्रांत दिनकर (एमएसडब्ल्यू), शितल कजरे (पीएचएन) यांच्या निर्देशनाखाली करण्यात आले. यासाठी वैद्यकीय अधिकारी डॉ. वानखेडे व योगेश म्हसे (टिबी हेल्थ व्हिजीटर्स) यांचे सहकार्य लाभले. १०० दिवसीय क्षयरोग मोहिमेवर एमजीएम वैद्यकीय महाविद्यालयामधील डॉ.सुनिला संजीव, डॉ.सौम्या (टाटा हॉस्पिटल) यांनी माहिती दिली व मार्गदर्शन केले.

जास्तीत जास्त क्षयरुग्ण वेळेत शोधून उपचाराखाली आणणे, क्षयरोगाचा मृत्यू दर कमी करणे, क्षयरोगाचा प्रसार कमी करून नवीन क्षयरुग्ण टाळणे, असे या मोहिमेचे उद्दिष्ट आहे. या मोहिमे अंतर्गत क्षयरोगाबाबत जास्तीत जास्त जनजागृती करावयाची आहे. त्याकरिता विविध उपक्रम करण्यात येत आहेत.

# कुणबी युवती महिला सामाजिक संघटनेच्या दिनदर्शिकेचे प्रकाशन

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव तालुका कुणबी युवा मंच मुंबई सामाजिक संघटना अंतर्गत कुणबी युवती महिला सामाजिक संघटना यांच्या माध्यमातून दिनदर्शिका प्रकाशन सोहळा ज्ञानेश्वर खराडे यांच्या अध्यक्षतेखाली गुजराती सेवा मंडळ माटुंगा येथे झाला.

प्रकाशन सोहळ्यास कुणबी युवा मंच मुंबई माणगाव तालुका पदाधिकारी



अध्यक्ष ज्ञानेश्वर खराडे, उपाध्यक्ष दत्तगुरू उभारे, सुनील माठल, सचिव सत्यजित भोनकर, खजिनदार नारायण शिंदे, सहसचिव काशिनाथ शिंदे, सहखजिनदार विनायक म्हस्के, नरेश भोसले, संपर्कप्रमुख संतोष उंडरे, राजेश शिर्के, संतोष उभारे, सल्लागार श्रीधर भोईर, राजेश शिर्के, मधुकर टेंबे, सदस्य चंद्रकांत टेंबे, श्रीराम जुमारे, वैभव शिंदे, किरण शिगवण, रुपेश वाढवळ, महिला संघटना अध्यक्ष रूपेक्षा भोस्तेकर, उपाध्यक्ष अस्मिता शिंदे, सहसचिव सलोनी पाटेक, संघटक स्वप्नाली शिंदे, संपर्कप्रमुख स्वरूपा भोईर, कल्पना खराडे, सल्लागार दिपाली शिर्के, सदस्य विशाखा तेटगुरे, समीक्षा दळवी, चेतना तेटगुरे, बेबी सुरेश टेंबे आदींसह माणगाव तालुक्यातील समाज बांधव-भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. मान्यवरांनी मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक वैभव शिंदे यांनी, तर सूत्रसंचालन संघटनेचे सचिव सत्यजीत भोनकर यांनी केले.

# माथेरानमध्ये वीर हुतात्मा भाई कोतवाल यांचा स्मृतिदिन

**माथेरान : प्रतिनिधी**

भारतमातेला दास्यमुक्त करण्यासाठी ज्या १०५ राष्ट्रवीरांनी बलिदान दिले त्यापैकी एक माथेरानचे सुपुत्र वीर हुतात्मा अण्णासाहेब कोतवाल यांची २ जानेवारीस ८२वी पुण्यतिथी होती.

वीर हुतात्मा भाई कोतवाल यांनी स्वातंत्र्य लढ्याच्या इतिहासाची पाने सुवर्णाक्षरांनी लिहिली होती. त्यांच्या पुण्यतिथी निमित्ताने येथील नौरोजी उद्यानात आदरांजली वाहण्यात आली. या वेळी मुख्याधिकारी राहुल इंगळे, सदानंद इंगळे, कार्यालय अधीक्षक प्रवीण सुर्वे, मुख्याध्यापक दिलीप अहिरे, माजी नगराध्यक्ष अजय सावंत, प्रेरणा सावंत,माजी उपनगराध्यक्ष आकाश चौधरी,



चंद्रकांत जाधव, माजी नगरसेवक शिवाजी शिंदे, प्रकाश सुतार, प्रदीप घावरे, राजेश चौधरी, राकेश चौधरी, वनसमिती अध्यक्ष योगेश जाधव, भास्कर शिंदे, निखिल शिंदे, अंकुश इचके, अभिमन्यू येळवंडे, अन्सार शेख, उमेश मोरे, संदेश कदम, वाठोरे आदी उपस्थित होते.

# 'आजच्या काळात मला काय मिळेल ही भावना'

**कर्जत : प्रतिनिधी**

समाजात अनेक सामाजिक कार्यकर्ते काम करतात, परंतु आपल्या आई-वडिलांचे नाव एखाद्या शाळेला, एखाद्या रस्त्याला, एखाद्या वाचनालयाला द्यावे असे फार थोडे लोक आहेत. आजच्या काळात पहिल्यांदा मला काय मिळेल ही भावना आहे, असे प्रतिपादन माजी आमदार आणि लोकसेवा प्रतिष्ठानचे अध्यक्ष दीपक पायगुडे यांनी येथे केले.

कर्जत तालुका विद्या प्रसारक मंडळाच्या स्वातंत्र्य सैनिक दत्तात्रेय पांडुरंग डोंबे विद्यानिकेतन प्रशालेच्या रौप्य महोत्सवी वार्षिक स्नेहसंमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. दीपक पायगुडे यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून समारंभाचे



उद्घाटन करण्यात आले.

या वेळी माजी आमदार व कर्जत तालुका विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष सुरेश लाड, संस्थेचे कार्याध्यक्ष मुकुंद मेढी, सचिव डॉ. नितीन आरेकर, खजिनदार दीपचंद जैन, माजी नगरसेवक हेमंत डोंबे, प्रकाश भुतकर, शालेय समिती अध्यक्ष माधव भडसावळे, रोहिणी जोशी, मुख्याध्यापिका मीरा कडू, माया म्हसे, रणजित जैन, राजेश ओसवाल, समीर डोंबे, विद्यार्थी प्रतिनिधी रिध्दी तिखंडे आदी उपस्थित होते.

मीरा कडू यांनी उपस्थितांचे स्वागत केले. डॉ. नितीन आरेकर यांनी संस्थेच्या पंचविस वर्षाचा इतिहास सांगितला. म्हसे यांनी अहवाल सादर केला. त्यानंतर विविध क्षेत्रात यश मिळविलेल्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते पारितोषिके देण्यात आली. आदर्श विद्यार्थी, विद्यार्थिनी व उत्तम शिक्षकांना गौरविण्यात आले.

अध्यक्षीय भाषणात सुरेश लाड यांनी, कर्जतमध्ये अनेक क्षेत्रात काम करणारे आहेत. येथील हुतात्मे, स्वातंत्र्य सैनिक तसेच चित्रकारांनी साता समुद्रापार प्रदर्शने भरवून कर्जतला वैभव प्राप्त करून दिले. शाळेला वेळ देणे अनेक पदाधिकारी व सदस्यांना जमत नाही. मात्र सर्वांनी आता वेळ दिला पाहिजे. भविष्यात चांगली इमारत होईल असे वाटते. असे स्पष्ट केले.

माधव भडसावळे यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन पिराजी पालवे व वैजू शेळके यांनी केले, तर उपस्थितांचे आभार प्रदर्शन स्नेहसंमेलन प्रमुख विनायक अहिरे यांनी मानले. या वेळी कर्जतकर उपस्थित होते.

# हुतात्मा बलिदान दिनी कर्जत शहरात मशाल मिरवणूक

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातील हुतात्मा वीर भाई कोतवाल आणि हुतात्मा हिराजी पाटील यांच्या ८२व्या बलिदान दिनानिमित्त कर्जतमध्ये विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. हुतात्मा स्मृती समितीच्या वतीने कर्जत शहरात मशाल मिरवणूक काढण्यात आली. त्यानंतर हुतात्म्यांना आदरांजली वाहण्यात आली.



कर्जतच्या टिळक चौकात हुतात्मा बलिदान दिनाचे आयोजन करण्यात आले होते. पहाटे ठीक सहा वाजून दहा मिनिटांनी प्रा. जयपाल पाटील यांच्या हस्ते क्रांतीज्योत प्रज्वलित करण्यात आली. विजय मांडे व महेंद्र चंदन यांच्या हस्ते हुतात्मा भाई कोतवाल आणि हुतात्मा हिराजी पाटील यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आला. ॲड. गोपाळ शेळके, ॲड. संतोष जोहेकर, आदींनी सिद्धगड हून आणलेल्या मृतिकेचे पूजन शरद पवार यांच्या हस्ते करण्यात आले.

याप्रसंगी नाभिक समाजाचे अध्यक्ष दिलीप शिंदे, उपाध्यक्ष कृष्णा पवार, त्यानंतर राहुल गायकवाड व गणेश गायकवाड यांच्या नेतृत्वाखाली शहरातून मशाल मिरवणूक काढण्यात आली. शहरातील शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्याला यांच्या मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला.

मिरवणूक टिळक चौकात आल्यानंतर एका विशेष समारंभात जय शिंदे या चिमुकल्याने दोन्ही हुतात्म्यांच्या कार्याची व बलिदानाची प्रसंगानुरूप माहिती सांगितली. रघुनाथ विभार यांनी हुतात्मा भाई कोतवाल यांच्या जीवना वरील गीत सादर केले. परशुराम गायकवाड

### समितीच्या वतीने हुतात्म्यांना अभिवादन

यांनी हुतात्म्यांचा इतिहास सांगितला. जयपाल पाटील यांनी, 'नवीन पिढीला आपल्या हुतात्म्यांची माहिती असणे आवश्यक आहे. या समारंभात विद्यार्थ्यांचा सहभाग आवश्यक आहे. जनतेने शासकीय योजनांचा लाभ घ्यावा.' असे स्पष्ट केले. अध्यक्षीय भाषणात ॲड. गोपाळ शेळके यांनी 'गेली बेचाळीस वर्षे आम्ही हा हुतात्मा दिन साजरा करीत आलो आहोत. काही वर्षांपूर्वी या समारंभाचे स्वरूप मोठे होते. या समारंभात जास्तीत जास्त लोकांनी सहभागी व्हायला पाहिजे.' असे सूचित केले. या कार्यक्रमाला कर्जत तालुका नाभिक समाज संघटनेचे सहकार्य लाभले.

याप्रसंगी विश्वनाथ मंडलिक, नारायण गायकवाड, ॲड . ज्योत्स्ना जाधव, ॲड. कल्पना वांजळे, ॲड. निशा शेळके, रजनी आढाव, शशिकांत मंडलिक, दत्ता म्हसे, दिनेश पवार, रजनी विभार, कल्पना मंडलिक, दिनेश पवार, दीपक पवार, मयुर पवार, दीपक पवार, वसंत कोकरे, विशाल कोकरे, संतोष मंडलिक, राकेश डगळे, संतोष पवार, सुनील आढाव, जयेश शेलार, मयंक चंदने, मच्छिंद्र पवार आदींसह कर्जतकर मोठ्या संखेने उपस्थित होते.



# अलिबागमध्ये बैलगाडी शर्यतीचा थरार

**अलिबाग : प्रतिनिधी**

अलिबागमधील बैलगाडीवानांनी नवीन वर्षाची सुरुवात स्पर्धेचे आयोजन करून केली. किहीम समुद्र किनारी झालेल्या शर्यतीत १३५ बैलगाड्या सहभागी झाल्या होत्या. या वेळी घोडागाडी स्पर्धाही घेण्यात आली.

हौशी बैलगाडी संघटना झिराड यांनी या स्पर्धेचे आयोजन केले होते. किहीम येथील मिलिंद वामन पडवळ यांच्या गाडीने प्रथम क्रमांक पटकावला. आद्य अमित नाईक (म्हात्रोळी) यांच्या गाडीने दुसरा, तर प्रसन्ना सुर्वे कातळपाडा यांच्या गाडीने तिसरा क्रमांक पटकावला. आमदार महेंद्र दळवी यांनी या स्पर्धेला भेट देऊन शुभेच्छा दिल्या

# कै. नटवरलाल शहा यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त विद्यार्थ्यांना प्रमाणपत्राचे वाटप

**चौक, मोहोपाडा : प्रतिनिधी**

विद्या प्रसारिणी सभा चौकचे संस्थापक स्वातंत्र्यसैनिक कै. नटवरलाल लल्लुदास शहा यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त सरनौबत नेताजी पालकर विद्यामंदिर व यशवंतराव देशमुख कनिष्ठ महाविद्यालय चौकमधील विद्यार्थ्यांना प्रमाणपत्राचे वाटप करण्यात आले.

कै. नटवरलाल यांचे पुत्र व संस्थेचे सचिव योगेंद्र शहा यांच्या हस्ते पाचवी ते बारावीपर्यंतच्या एकूण १२०० विद्यार्थ्यांना प्रमाणपत्राचे वाटप करण्यात आले. २०२५ या कै. नटवरलाल यांच्या जन्मशताब्दी वर्षात सरनौबत नेताजी पालकर विद्यामंदिर चौक व यशवंतराव देशमुख कनिष्ठ महाविद्यालय चौक या शाळेत शिक्षण घेत आहात.

आपण भाग्यवान आहात की, या जन्मशताब्दी वर्षाचे आपण साक्षीदार आहात अशा शब्दात छापलेले प्रमाणपत्राचे संस्थेचे सचिव योगेंद्र शहा यांच्या हस्ते वितरण करण्यात आले. प्राचार्य भोमले, मुख्याध्यापिका पुजारी, पर्यवेक्षक मोळीक आदी उपस्थित होते.



# भारतीय फलंदाजांची हाराकिरी सुरूच!

**सिडनी : वृत्तसंस्था**

**सिडनी कसोटीत पहिला डाव १८५ धावांमध्ये आटोपला**

भारत विरुद्ध ऑस्ट्रेलिया पाच सामन्यांच्या बॉर्डर-गावसकर कसोटी मालिकेतील पाचवी आणि शेवटची कसोटी सिडनी क्रिकेट ग्राउंडवर खेळली जात आहे. पहिल्या दिवशी नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजीला आलेली टीम इंडिया १८५ धावांत गारद झाली. यानंतर दिवसाचा खेळ संपेपर्यंत ऑस्ट्रेलियानेही नऊ धावांत एक गडी गमावला आहे.

या सामन्यात टीम इंडियाने नियमित कर्णधार रोहित शर्माला वगळण्याचा निर्णय घेतला होता. रोहितच्या जागी शुबमन गिलला प्लेइंग इलेव्हनचा भाग बनवण्यात आले. गिलला फार काही करता आले नाही. तरी त्याने दोन चौकारांच्या मदतीने केवळ २० धावा केल्या. या सामन्यात जसप्रीत बुमराह भारताचे नेतृत्व करत आहे.

गोलंदाजीत ऑस्ट्रेलियाकडून स्कॉट बोलंडने सर्वाधिक चार बळी घेतले. यानंतर ऑस्ट्रेलियन संघ पहिल्या डावात फलंदाजीसाठी मैदानात उतरला. उस्मान ख्वाजा आणि सॅम कॉन्स्टन्स डावाची सुरुवात केली. बुमराहने दिवसाच्या शेवटच्या चेंडूवर ख्वाजाला बाद करून टीम इंडियाचे काही प्रमाणात पुनरागमन केले. ख्वाजा दोन धावा करून पॅव्हेलियनमध्ये परतला.

# राष्ट्रीय चॅम्पियनशिपमध्ये कराटेपटूंचे यश

**उलवे नोड : रामप्रहर वृत्त**

निहॉनसिकी कराटे अ‍ॅण्ड स्पोर्ट्स फेडरेशनच्या वतीने पालघर-केळवे रोड शितला धाम येथे राष्ट्रीय स्तरावरील चॅम्पियनशिप व शिबिर आयोजित करण्यात आले होते. यामध्ये उलवे नोडमधील रामशेठ ठाकूर इंटरनॅशनल स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स आणि तिवरेकर सेल्फ डिफेन्स अ‍ॅण्ड स्पोर्ट्स अकॅडमीच्या विद्यार्थ्यांनी एकूण ५२ पदके व संघ म्हणून प्रथम क्रमांकाचे पारितोषिक पटकावले.

या कराटेपटूंनी विविध वयोगट आणि वजन श्रेणींमध्ये काता आणि कुमिते प्रकारात एकूण १७ सुवर्ण, १९ रौप्य आणि १६ कांस्यपदके जिंकली. त्यांना क्योशि राकेश तिवरेकर आणि सेन्सई हरेश्वर तांबडकर यांनी प्रशिक्षण दिले. यशस्वी कराटेपटूंचे माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी अभिनंदन व कौतुक केले.



**सविस्तर निकाल**

इफ्राज शेख, कृष्णा गुप्ता, सानिका थोरात, केवंश पाटील काता व कुमिते सुवर्ण; सांज नाईक, मुर्दुला कलबुर्गी काता सुवर्ण व कुमिते रौप्य; युवा दहिया, ओम ठाकूर, रियान प्रभुणे, अव्यान शुक्ल काता सुवर्ण; प्रिनल भालेराव, केयांश केळुस्कर काता रौप्य व कुमिते सुवर्ण; वैभव मौर्य, तन्वी दहिया, समृद्धी सिंग, जैदान खान, सोहम डोलासिया काता रौप्य व कुमिते कांस्य; शार्दुल धामणस्कर काता कांस्य व कुमिते सुवर्ण; स्वरा पिंगळे, जीविका पाटील, उत्कर्ष नारायण काता कांस्य व कुमिते रौप्य; अविजितवीर सिंग, राजवीर रौत्रय काता व कुमिते रौप्य; श्रावणी तितीरमारे, राज गुप्ता, तनिषा पांडुकोणी काता व कुमिते कांस्य; आरव पवार, तन्वी पानसरे काता सुवर्ण व कुमिते कांस्य.

# शिवाज्ञा संघ एमपीएल २०२४चा विजेता



**उरण : बातमीदार**

एकाच गावातील खेळाडूंची लिलाव पद्धतीने १६ संघांची निवड करून त्याची लीग आयोजिली जाते ती म्हणजे उरण तालुक्यातील टेनिस क्रिकेट स्पर्धा मोठी जुई प्रीमियर लीग. या लीगच्या २०२४च्या चौथ्या पर्वाचे आयोजन एव्ही स्पोर्ट युवा प्रतिष्ठान मोठी जुईच्या माध्यमातून केले गेले होते. या पाच दिवसीय खेळल्या गेलेल्या स्पर्धेचा ३१ डिसेंबर रोजी अंतिम सामना झाला आणि यात शिवाज्ञा संघाने बाजी मारली.

प्रिन्सि प्रिता इलेव्हन संघाने द्वितीय क्रमांक, एसएसडी इंडियन संघ तृतीय, तर काव्य इंटरप्रायझेस संघाने चतुर्थ क्रमांक मिळवला. यंदाच्या एमपीएलमध्ये मालिकावीर अन् बाईकचा हकदार ठरला जितेश नंदकुमार भोईर.

याशिवाय उत्कृष्ट फलंदाज हेमंत माया पाटील याला सायकल, उत्कृष्ट गोलंदाज यश भरत पाटीलला सायकल, उत्कृष्ट क्षेत्ररक्षक हर्ष बाबू भोईरला शूज, रायझिंग स्टार हर्ष रमेश भोपीला उत्कृष्ट चषक देऊन गौरविण्यात आले. स्पर्धेसाठी स्मार्टसिटी डेव्हलपर्सचे प्रवीण घासे, सरपंच दीपक भोईर यांचे सहकार्य लाभले.

# रोहितसाठी मेलबर्न कसोटी शेवटची -सुनील गावसकर

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

सिडनीमध्ये खेळल्या जात असलेल्या बॉर्डर-गावसकर ट्रॉफीच्या अखेरच्या सामन्यात रोहित शर्माने विश्रांती घेण्याचा मोठा निर्णय घेतला. त्याच्या जागी जसप्रीत बुमराह संघाचे नेतृत्व करत आहे. भारताचे माजी कर्णधार आणि महान फलंदाज सुनील गावसकर यांचे वेगळेच म्हणणे आहे. रोहितने शेवटचा कसोटी सामना खेळला आहे आणि आता भारताने त्याच्यापासून पुढे जावे, असे त्यांचे मत आहे.

भारताचे माजी प्रशिक्षक रवी शास्त्री यांनीही सुनील गावसकर यांच्याशी सहमती दर्शवली आहे.






# रायगडची क्लासिक पॉवरलिफ्टिंग स्पर्धा ११ जानेवारीला पनवेलमध्ये

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रायगड जिल्हास्तरीय क्लासिक पॉवरलिफ्टिंग स्पर्धा ११ जानेवारी रोजी पनवेल येथे होणार आहे. सब ज्युनिअर, सीनिअर, ज्युनिअर आणि मास्टर्स (४०, ५०, ६०, ७० वर्षांवरील) पुरुष आणि महिला अशा गटात स्पर्धा होईल.

आगरी समाज मंडळाच्या पनवेल शहरातील महात्मा जोतिबा फुले सभागृहात ११ जानेवारीला सकाळी ८ वाजता स्पर्धेस सुरुवात होणार असून या वेळी अनेक नामवंत व्यक्तींना निमंत्रित करण्यात येणार आहे. यातून राज्य स्पर्धेसाठी रायगडचा संघ निवडला जाईल, अशी माहिती राष्ट्रीय पॉवरलिफ्टिंग ज्येष्ठ खेळाडू माधव पंडित आणि खजिनदार राहुल गजरमल यांनी दिली. स्पर्धेसाठी निरीक्षक म्हणून शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त व महाराष्ट्र राज्य संघटनेचे सचिव संजय प्रताप सरदेसाई हे हजर राहणार आहेत.

रायगड जिल्ह्यातील संलग्न असलेल्या व्यायामशाळा, संस्था यांनी आपल्या खेळाडूंची नोंदणी योग्य वेळेत करावी, असे पॉवरलिफ्टिंग स्पोर्ट्स असोसिएशनचे सहसचिव सचिन भालेराव यांनी प्रसिद्धी पत्रकान्वये यांनी कळविले आहे.



















